# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.
# दिशा
वर्ष तिसरे / अंक १० / सप्टेंबर २००३

## संपादकीय

## सबसे तेज... मरने का इंतजार !

'सबसे तेज' संस्कृती निर्माण करण्याच्या नादात वृत्त वाहिन्यांनी जे स्पर्धा युद्ध आरंभलं आहे ते भयानक होत चाललं आहे. 'पळा पळा कोण पुढे पळे तो...' या वृत्तीचं विष अंगात भिनलेली आपण माणसं प्रत्येक गोष्टीचा साचा बनवून टाकत असतो. दरवर्षी तेच उत्सव, त्याच विकृत बनत जाणाऱ्या पद्धतीने साजरी करणारी आपण 'सामान्य' माणसं. बॉम्बस्फोटाचं आपण असंच केलं. स्ट्रेचरवर नेली जाणारी प्रेतं, ज्यांच्या नावातच दहशत (वाद) दडलेली आहे अशा माननीय मंत्री संत्री यांच्या प्रतिक्रिया, पोलिस बंदोबस्तात वाढ केली आहे असं सांगितलं जाणं आणि या सर्वांबद्दल नकाश्रू ढाळत बारा तासांच्या अंतराने पोटाच्या मागे पळणारे आपण, हा बॉम्बस्फोटांचा साचा झाला आहे. एखादा मोठा नट गेला, नेता वारला की टी.व्ही.च्या वृत्तवाहिन्यांतून 'श्रद्धांजली' वाहण्याचा एक साचा आहे, तसाच हा एक साचा. 'सबसे तेज' धावणाऱ्या सर्वच 'हेडीकॅम'वाल्या बातमीदारांचा आपल्या वाहिनीवरूनच न्यूज ब्रेक करावी यासाठी चालणारा आकांत ! ते बिचारे काय करतील? पापी पेट का सवाल आहे. पण यातून दोनच्या जागी चार, सहा बॉम्बस्फोटाच्या बातम्या दिल्या जाणे, धडधाकट पंतप्रधानांविषयी 'आजारी आहेत' अशी बातमी येणं, एवढंच नाही तर यापेक्षाही विनोदी गोष्टी, विनोदी भाषेत प्रसारित केल्या जातात. इतके दिवस छापील सर्व ते खरं मानणारी जनता आता 'आँखो देखा, कानों सुना' बातम्या खरं मानायला लागली आहेत. अशा बातम्यांतील एक खास वैशिष्ट्य म्हणजे 'मृतांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता, व्यक्त करण्यात येत आहे.' हे वाक्य ! हे ऐकलं की असं वाटतं, आणखी काही माणसं मरण्याची हे लोक वाट पहात आहेत. तर या वृत्तवाहिन्यांचा हा आँखो देखा हाल नाशिकचा कुंभमेळा असो, दमणचा पूल असो, जातीय दंगे असो, महाआरत्या असो.. त्याबद्दल काय बातमी देत आहोत, सत्यासत्यता पडताळली आहे काय, नसेल तर तिचा संभाव्य व मूलगामी परिणाम जनमानसावर काय होऊ शकतो.. प्रसारणापूर्वी कोणताही विचार केलेला असतो असे वाटत नाही. हे सबसे तेज चालणारे लोक तर स्मार्ट मित्र बनून येणाऱ्या वृत्तपत्रांचं आणखीनच वेगळं प्रकरण ! एकाच्या हेडलाईनमध्ये ३०० ठार असतील तर दुसऱ्याच्या हेडलाईन २५० ठार असे सांगत 'मित्र' घरात शिरतो. कोणाच्या बातमीत शासनाने मृतांच्या नातेवाईकांना २ लाख रुपये जाहीर केलेले असतील तर कोणाच्या बातमीत १ लाख ! या आकड्यांचं शास्त्र अगम्य आहे ! मृतांच्या नातेवाईकांची वाचक व्यासपीठासारख्या माध्यमातून मनोगते येतात, त्यात अद्याप (म्हणजे ६ महिने लोटले तरी) एक पैसाही मिळाला नाही अशी कितीतरी पत्रे येतात. मग ६ महिन्यापूर्वी मंत्री मृतांच्या नातेवाईकांना अर्थसाहाय्याचे वाटप करताना याच वर्तमान पत्रानं छापलेले फोटो काल्पनिक होते की काय... कळत नाही. मग सामान्य माणूस म्हणून आपण काय करायचं?.... काही वाटूनच घ्यायचं नाही. फार तर फार एखाद्या 'शक्तीशाली आरडीएक्स' वाल्या बॉम्बस्फोटात आपणही सापडावे अशी प्रार्थना करायची !!!

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तिसरे / अंक १० / सप्टेंबर २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कुंभमेळ्याचा इतिहास | गीतेश गजानन शिंदे | ३ |
| २) | उद्याचा विद्यार्थी आणि शिक्षक | प्रा. सौ. मानसी जोशी | ६ |
| ३) | साहित्य विश्व | श्री. शरद जोशी | १० |
| ४) | श्री मंगल मूर्तये नमः | श्री. शं. बा. मठ | १२ |
| ५) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १८वा) ॥ मोक्षसंन्यासयोगः ॥ | आशा भिडे | १८ |
| ६) | परिसरवार्ता | संकलित | २९ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# 'कुंभमेळ्याचा इतिहास'

*कुंभमेळा माध्यमांमुळे कधी नव्हे इतका गाजला या विषयासंबंधी*

*- संपादक*

ही कथा श्रीमद्‌भागवतात वर्णिली आहे. कोट्यावधी वर्षांपूर्वी स्वर्गलोकांत आपले सर्वश्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी देव आणि दानवांमध्ये घनघोर युद्ध झाले. हिरण्यकशिपूचा वंशज, बली महाराज हे दानवांचे प्रतिनिधीत्व करीत होते. एकदा देवतांचा राजा इंद्राने दुर्वास ऋषींचा अपराध केला. यामुळे क्रोधित होऊन दुर्वास ऋषींनी देवतांना दारिद्री होण्याचा शाप दिला. या शापामुळे देवता आपली सर्व सत्ता, बल आणि जीवनातील सर्व पावित्र्य गमावून बसले. परिणामी, असुरांबरोबर झालेल्या युद्धांत त्यांना पराभव पत्करावा लागला. यावेळी देवतांनी भगवान विष्णूंकडे मदतीची याचना केली. पूर्ण पुरूषोत्तम भगवंतांनी त्यांना युद्ध थांबवून दानवांशी संधी करण्यास सांगितली. भगवंतांनी सुचविले की, त्या दोघांनीही अमृताच्या प्राप्तीकरिता क्षीरसागराचे मंथन करण्यासाठी एकत्र यावे आणि पुढे त्या अमृताचे देव-दानवांमध्ये समान करता येईल.

भगवान श्रीविष्णू सदाचारी देवतांचे नेहमीच रक्षण करतात. संपूर्ण विश्वामध्ये आपला प्रभाव प्रबळ करीत असलेल्या दानवांवर, देवतांना विजय प्राप्त करावयाचा होता. भगवान विष्णूंनी देवतांना असुरांबरोबर कार्य करीत असताना, साप आणि उंदराचे तत्व व अनुसरण्याचा सल्ला दिला. एकदा साप आणि उंदीर एका टोपलीत अडकले. तेव्हा साप उंदरास म्हणाला, 'हे बघ ! मी तुला अगदी सहजपणे गिळंकृत करू शकतो; परंतु या टोपलीतून बाहेर पडणे माझ्यासाठी अधिक महत्वाचे आहे. तेव्हा तू या टोपलीला भोक का पाडीत नाहीस, ज्यायोगे आपल्या दोघांचीही सुटका होईल?' उंदराने हा प्रस्ताव मान्य करून टोपलीस छिद्र पाडण्यास सुरुवात केली, पण पुरेसे मोठे छिद्र तयार होताच, सापाने उंदरास गिळंकृत करून तो टोपलीबाहेर आला.

असुरांना अमृत देण्याचा भगवंतांचा कोणताही हेतू नव्हता, कारण असुर कपटी व संकट निर्माण करणारे होते. अशा लोकांना अमृताचे वितरण करणे हे बुद्धिमत्तेचे लक्षण नव्हते. भगवद्‌गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात की, जीव दोन प्रकारचे आहेत, एक दैवी तर दुसरे आसुरी. श्रीमद् प्रभुपाद स्पष्टीकरण देताना सांगतात, 'जे लोक जन्मत: दैवी गुणांनी युक्त असतात ते शास्त्रांच्या विधानांची, भगवंतांची आणि त्यांच्या प्रतिनिधींची आज्ञा पालन करतात, तर इतर लोक स्वत:च्या इंद्रियांच्या संतुष्टीकरिता स्वैराचारी आचरण करतात.'

भगवान श्रीविष्णूंच्या आज्ञांचे पालन करीत देवता असुरांच्या नेत्यांकडे गेले आणि त्यांच्यासमोर हा प्रस्ताव मांडला. असुर याला सहमत झाले. त्यानंतर ते सर्वजण मंथनाला प्रारंभ करण्यासाठी क्षीरसागराजवळ गेले. भगवान विष्णूंनी मंदार पर्वतास, आपले वाहन गरूड याच्या पाठीवरुन सागरापर्यंत वाहून आणण्यास त्यांना मदत केली. देव आणि दानव क्षीरसागराच्या किनारी पोहोचताच भगवंतांनी मंदार पर्वत सागराच्या मध्यभागी ठेवला. या पर्वताचा मंथनासाठी रवी म्हणून उपयोग होणार होता. गरूडाचे व सर्पाचे शत्रूत्व जाणून भगवंतांनी गरूडाला तेथून निघून जाण्यास सांगितले, ज्यायोगे सर्पराज वासुकी तेथे येऊ शकेल आणि त्याचा मंथनासाठी रवीचा दोर म्हणून

उपयोग करता येईल.

दानवांनी वासुकीच्या मुखाकडील भाग धरण्यासाठी आग्रह केला, तर भगवान विष्णूंनी प्रोत्साहित केल्यावर दानवांनी वासुकीची शेपटी पकडली. अमृताची निर्मिती करण्यासाठी त्यांनी वासुकीस खेचण्यास सुरुवात केली, तेव्हा वासुकीच्या असंख्य मुखांमधून धूर व धगधगणारा अग्नी बाहेर पडू लागला. त्यामुळे असुरांना अतिशय यातना भोगाव्या लागल्या.

त्या विशाल मंदार पर्वताच्या पायथ्याशी कोणताही आधार नसल्यामुळे देव आणि असुरांनी मंथन सुरू केल्यावर तो पर्वत क्षीरसागरामध्ये बुडू लागला. त्यावेळी भगवंतांनी कूर्मरूप धारण केले आणि मंथन पुढे चालू रहावे यासाठी समुद्रात प्रवेश करून तो पर्वत आपल्या पाठीवर धारण केला. श्रीमद् भागवतामध्ये वर्णन केले आहे की, आपल्या पाठीवर होणाऱ्या मंदार पर्वताच्या हालचालीने कूर्म भगवंतांच्या पाठीला खाज आली. त्यांना एक प्रकारचा सुखद अनुभव झाला. त्यांनी आनंदाने सुस्कारा टाकला. या मंथनातून प्रथम हलाहल विष निर्माण झाले आणि ते सर्व दिशांना पसरू लागले. भयभीत झालेल्या देवतांनी भगवान शंकराचा आश्रय घेतला. भगवान शिव अतिशय दयाळू असल्यामुळे त्यांनी ते सर्व विष आपल्या ओंजळीत एकत्रित करून प्राशन केले. ते सर्व विष त्यांनी आपल्या कंठात धारण केले, त्यामुळे त्यांच्या कंठास एका अलंकाराप्रमाणे निळी छटा आली. तेव्हापासून भगवान शंकरांना 'नीळकंठ' म्हटले जाऊ लागले.

श्रीशंकर ते विष प्राशन करीत असताना त्यापैकी थोडे थेंब त्यांच्या ओंजळीतून खाली पडले. विविध वनस्पती, विंचू, सर्प आणि इतर तत्सम जीवांनी ते थेंब ग्रहण केल्यामुळे ते विषारी बनले. हलाहल विषानंतर अनेक ऐश्वर्यशील वस्तू सागरातून निर्माण झाल्या. त्यांचे मंथन करणाऱ्या दोन गटांमध्ये वितरण करण्यात आले. प्रथम सुरभी गाय प्रकट झाली व महर्षींनी तिचा स्वीकार केला. उच्चैश्रवा नामक श्वेत अश्व प्रकट झाला तेव्हा बली महाराजांनी त्याचा स्वीकार केला. गजराज ऐरावत प्रकट झाला तेव्हा इंद्राने त्यास स्वत:साठी घेतले. सर्वांत मौल्यवान कौस्तुभमणी निर्माण झाल्यावर त्यास, श्रीविष्णूंनी त्यांचे वक्ष:स्थळ सुशोभित करण्यासाठी अर्पण केले गेले. त्यानंतर पारिजात वृक्ष निर्माण झाला, जो देवतांना देण्यात आला.

नंतर देवतांच्या सभेमध्ये मनोरंजन करणाऱ्या अनेक सुंदर नृत्यांगणा, अप्सरा आणि श्रीलक्ष्मीदेवी प्रकट झाल्या. लक्ष्मीदेवी श्रीविष्णूंची सहचारीणी झाली. त्यानंतर मदिरेची देवता, वारूणी प्रकट झाली आणि असुरांनी तिला ताब्यात घेतले. त्या सागरातून 'भालचंद्र' नामक चंद्राची कोर निर्माण झाली. तिच्या शीलतेमुळे श्रीशंकरांनी तिचा आपल्या मस्तकावर धारण करण्याकरिता स्वीकार केला, कारण विष प्राशन केल्यामुळे त्यांना भोवळ येऊ लागली होती. त्यानंतर पाञ्चजन्य नामक शंख व हरिधनू नामक धनुष्य प्रकट झाले आणि श्रीविष्णूंनी त्या दोन्हीही वस्तू स्वत:कडे ठेवल्या. अंतत: एक अद्भूत पुरुष प्रकट झाला. हा भगवंतांचाच अवतार होता, त्यांचे नाव धन्वंतरी होते. त्यांच्या हातामध्ये अमृताने काठोकाठ भरलेला अमृतकुंभ होता. ज्या अमृतामध्ये देव व दानव इतके कठोर परिश्रम करीत होते, ते अमृत प्रकट होण्यापूर्वी त्या दोघांमध्ये कोणताही मतभेद नव्हता; परंतु त्यांनी मनात ज्याची अपेक्षा केली होती ते अमृत हातात घेऊन आलेल्या धन्वंतरींना पाहताच त्यांचे इंद्रिय संयमन व धैर्य नष्ट झाले. असुरांनी त्वरित बलपूर्वक तो कुंभ हिसकावून घेतला आणि दोघांतील मतभेदाची परिणती युद्धात झाली. स्कंद पुराणानुसार हे युद्ध चालू असताना इंद्रपुत्र जयंताने तो कुंभ मिळविला आणि त्यासह तो स्वर्गलोकाच्या दिशेने धावू लागला. असुरांनी त्याचा पाठपुरावा केला आणि त्यांच्यात तुंबळ युद्ध सुरू झाले.

या स्वर्गीय बारा दिवसांच्या काळात, प्रत्येक वेळी थोडे अमृत या भूतलावर - महाराष्ट्रात नाशिक, मध्यप्रदेशात उज्जैन, उत्तर प्रदेशात हरिद्वार आणि प्रयाग किंवा अलाहाबाद या चार ठिकाणी सांडले. स्वर्गातील एक दिवस म्हणजे पृथ्वीवरील एक वर्ष होय. त्यामुळे पृथ्वीवर अमृताचे थेंब पडण्याच्या घटनेच्या स्मृत्यर्थ या सर्व स्थानांवर मोठा मेळा बारा वर्षांतून एकदा भरविला जातो. आजही काही विशिष्ट ग्रह-स्थितींच्या काळात तेच अमृत दृश्यमान होते. कोट्यावधी लोक हे अमृतपान करून अमरत्व प्राप्त करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. नाशिकमध्ये यात्रेकरू गोदावरी नदीत स्नान करतात. उज्जैनमध्ये क्षिप्रा नदीत स्थान करतात; हरिद्वारमध्ये गंगेत आणि अलाहाबादमध्ये गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमामध्ये स्नान करतात.

युद्धाअंती असुरांनी देवतांचा पराभव केला आणि अमृतकुंभ पळवून नेला. यामुळे देवतांना अतिशय खिन्न झालेले पाहून भगवंत त्यांना म्हणाले, 'तुम्ही असे दुःखी होऊ नका. मी माझ्या स्वत:च्या शक्तीद्वारे त्यांच्यात भांडण-तंटा निर्माण करून त्यांना संभ्रमित करीन. अशाप्रकारे, मी अमृत पाप्त करण्याची तुमची इच्छा पूर्ण करीन.'

प्रथम अमृताचे पान कोण करणार, याविषयी असुरांमध्ये मतभेद निर्माण झाले आणि ते एकमेकांशीच भांडू लागले. त्याक्षणी भगवान श्रीविष्णूंनी एका अत्यंत सुंदर स्त्रीचे रूप धारण केले. हाच भगवंतांचा 'मोहिनी अवतार' आहे. जेव्हा भांडणाऱ्या दानवांनी या कटाक्ष टाकणाऱ्या आणि स्मित हास्य करणाऱ्या मोहिनीदेवीची प्रत्यंगे पाहिली, तेव्हा ते पूर्णपणे मंत्रमुग्ध झाले. भगवंतांनी धारण केलेल्या त्या रूपाचे सौंदर्य लक्ष्मीदेवीच्या सौंदर्यालाही लाजविणारे होते. तिच्या सौंदर्याने मोहित झालेल्या दानवांनी तिला एका निष्पक्ष व्यक्तीप्रमाणे अमृताचे वितरण करण्यास सांगितले. 'मी जे काही करेन किंवा म्हणेन त्यास कोणीही विरोध करणार नाही.' या अटीवर तिने अमृताचे वितरण करणे मान्य केले.

असुरांनी ही अट मान्य केली आणि अमृताचे वितरण करण्याची विनंती करीत तो अमृतकुंभ मोहिनीमूर्तींच्या स्वाधीन केला. धन्वंतरीकडून दानवांनी कुंभ हिरावून घेतला होता व तो स्वत:साठी राहून ठेवण्यास ते समर्थ असले तरीही भगवंतांच्या अतुलनीय आणि स्वाभाविक सौंदर्याने संमोहित होऊन त्यांनी मूर्खांप्रमाणे तो कुंभ गमाविला. मोहिनीमूर्तीने देव आणि दानवांना दोन वेगवेगळ्या रांगांमध्ये बसण्यास सांगितले आणि मधुर भाष्य करीत ते अमृत तिने देवतांना वाटण्यास सुरुवात केली. राहू नामक एका दानवाला तिचे हे कपट कळाले. देवतांचा वेष धारण करून तो देवतांच्या रांगेत जाऊन बसला. मोहिनीकडून त्याने अमृत देखील प्राप्त केले. त्याचवेळी सूर्य आणि चंद्राने त्याचे खरे रूप ओळखले व तात्काळ ओरडून त्याचे कपट सांगितले. मोहिनीमूर्तीने त्वरित आपले धारदार सुदर्शन चक्र धारण करून त्या असुराने अमृताचा घोट गिळण्यापूर्वीच त्याचे मस्तक धडावेगळे केले. यामुळे त्याचे कंठाखालील शरीर मृत झाले आणि मुख मात्र अमृताच्या प्रभावाने जिवंत राहिले. देवतांना अमृत प्राप्त करून दिल्यावर मोहिनीमूर्तीने श्रीविष्णूंचे आपले रूप प्रकट केले. त्यानंतर गरूडावर आरूढ होऊन भगवंत स्वधामास परतले.

- गीतेश गजानन शिंदे
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ १५११

# उद्याचा विद्यार्थी आणि शिक्षक

*उद्याचे विद्यार्थी घडवायचे असतील तर शिक्षकाने स्वत: बदलायला हवे. उद्याची आव्हाने वेगळी आहेत, या संदर्भात शिक्षक दिना निमित्त विचार मांडणारा हा लेख. - संपादक*

नव्या सहस्रकाचे स्वागत सर्वांनीच मोठ्या आनंदाने थाटामाटाने केले. नवीन सहस्रकातील उगवणाऱ्या नव्या सूर्याची वाट सर्वांनीच आतुरतेने पाहिली आणि सूर्योदयाचा आनंदही लुटला. समाज परिवर्तनाचे वारे सर्वप्रथम शिक्षण क्षेत्रात वाहू लागले आहेत. नवीन विचारांना, नव कल्पनांना, बदलांना सर्व प्रथम स्वीकारणारे समर्थ क्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र. नवीन सहस्रकातील नवनवीन शोध, तंत्रज्ञानाची प्रगती. आधुनिक विचार, यांचा आपल्या विद्यार्थ्यांवर नेमका कोणत्या प्रकारे परिणाम होईल? शिक्षक व विद्यार्थी हे दोन्ही घटक शिक्षणात (अध्ययन प्रक्रियेत) महत्वाचे दुवे आहेत. एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्याचे नाते जिवाशिवाचे आहे. तथापि अनंत काळापासून चालत आलेले हे गुरुशिष्याचे नाते कालौघाप्रमाणे बदलत आहे. पण उद्याचा विद्यार्थी कसा असेल हे पाहताना उद्याचा शिक्षक कसा असावा, हेही महत्त्वाचे आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षक व विद्यार्थी हे नाते चिरंतन रहावे, तितकेच प्रभावी रहावे, यासाठी आज नवीन परिवर्तनाला सामोरे जाणारे व्यक्तिमत्त्व व समर्थपणे जपणारे शिक्षक असायला हवेत म्हणजेच नवीन सहस्रकामध्ये खरे आव्हान आज शिक्षकांपुढे आहे.



संगणकाने शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविली आहे. संगणक शिक्षण अपरिहार्य झाल्यामुळे प्रत्येक विद्यार्थी नवीन ज्ञान स्वीकारण्यास उत्सुक झाला आहे. ज्ञानाची नवनवीन भांडारे आज त्याच्यासाठी खुली आहेत. स्वागतास सुसज्ज आहेत. जग त्याच्या खूपच जवळ आले आहे. त्यामुळे त्याच्या गरजाही वाढलेल्या आहेत. त्याला शिक्षकांकडून फक्त माहिती नको आहे, त्यापेक्षा अधिक काहीतरी हवे. ते नेमके काय? हे शोधून त्याला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. उद्याचा विद्यार्थी माहिती व तंत्रज्ञानामुळे बहुश्रुत असेल त्यांच्या बौद्धिक क्षमता व ज्ञान वाढलेले असेल. त्यामुळे त्याला निव्वळ उपदेश वा बौद्धिक विषयज्ञान देऊन चालणार नाही. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून शिक्षणाची व जीवनाधिष्ठित कौशल्याची सांगड, मूल्यांची जोपासना, माहिती तंत्रज्ञानाच्या आवाहनाला सामोरे जाणारे शिक्षण हवे.

आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्यात तरुणवर्ग आपोआपच बळी पडत आहे. दूरदर्शन आणि संगणक या माध्यमामुळे पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव अधिक दृढ होत आहे त्यातच इंग्रजी माध्यमाला अवास्तव महत्व, वाटणारी ओढ जीवघेणी आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे सर्वश्रुत विद्यार्थी. पाश्चात्य सण उदा. व्हॅलेंटाईन डे, फादर्स डे इ. आज सर्रास साजरे केले जातात. ते साजरे करावेत की नाही हा प्रश्न वादाचा आहे. पण उद्याचा विद्यार्थी भारतीय संस्कृतीपासून, विचारांपासून दूर तर जाणार नाही ना? याचा विचार शिक्षकांनीच करायला हवा.

## नवीन युगात विद्यार्थी

दिशाहीन होईल, त्याच्या मनाचा गोंधळ झाला आहे. जे दिसते ते तो स्वीकारतो, खरे मानतो पण प्रत्यक्ष आयुष्य त्याहून निराळे असते, असा त्याला अनुभव येत आहे. केवळ माहितीमुळे त्याची जिज्ञासा वाढीस लागते. त्यामुळे तो भौतिक लालसेच्या आहारी जाऊ लागतो. माहिती तंत्रज्ञानामुळे त्याच्या वयोगटापेक्षा, क्षमतेपेक्षा त्याला अधिक माहिती मिळते, ती माहिती त्याला बोजड झाली आहे. त्यामुळे तो गोंधळून गेला आहे. माणसाच्या स्वभावात सुप्त प्रवृत्ती, कल, विकृती लपलेल्या असतात. चार कल मूळातच मानले तर नरराक्षस, नरपशू, नर व नरोत्तम या चार अवस्थेतून त्याची वाटचाल सुरू असते. शिक्षणाने नरपशू नरोत्तम बनतो. आज नवयुगाच्या सुरुवातीसच अज्ञान, स्वार्थ, जिज्ञासा, अर्धवट माहिती, अपुरे विचार याचा परिणाम समाजाला भोगावा लागत आहे. त्यासाठी शिक्षणामध्ये विद्यार्थी नरोत्तम बनेल अशी ताकद निर्माण व्हायला हवी. स्वार्थापोटी नरपशु कधीही डोकावू शकतो, म्हणून उद्याच्या विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाची सहसंवेदना, सभोवताली घडणाऱ्या घटनांविषयी हृद्य भावना जागृत झाल्या पाहिजेत, त्याचे परिस्थिचे भान सुटता कामा नये. उद्याच्या विद्यार्थ्यालाही शिक्षकांमध्ये खरा गुरु दिसावा यासाठी शिक्षकांनी प्रतिभावान, विचारवंत व्हायला हवे.

उद्याची पिढी बुद्धिमान असेल त्यामुळे शिक्षणात संस्कृती केंद्रित अभ्यासक्रम असावा. विद्यार्थी दिशाहीन होऊ नये आपल्या 'ज्ञानाचा स्वयंनिर्माता' म्हणून त्याने स्वत:कडे पहावे, यासाठी अध्यापन समर्थ असावे. त्याला सुलभ मानवतावादी, पारदर्शक दोषविरहित प्रतिक्रिया मांडता आल्या पाहिजेत. राष्ट्रीय भावनेस बळकटी, सांस्कृतिक ठेव्याची जपणूक, स्वदेशी ज्ञानाचे संकलन, जागतिकीकरणाच्या परिणामास प्रतिकार म्हणून एकोप्याने रहाणे, सहकार्य भावना, स्वातंत्र्याचा विचार याकडे डोळसपणे पाहण्याचे सामर्थ्य उद्याच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायला हवे.

आज ज्ञानाच्या पारंपरिक संकल्पनेपेक्षा बहुविध ज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. प्रत्येक घटनेविषयी, विषयासंबंधी विद्यार्थ्याला सखोल माहिती संगणकाद्वारे मिळते आहे. संगणक माहिती देण्याचे काम करतो. त्यामुळे संगणक शिक्षकांची जागा घेऊ शकेल काय? अशी भिती आज निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला मिळणाऱ्या ज्ञानापेक्षा आपल्या ज्ञानाची उंची वाढविण्याचा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे. संस्कृती अधिष्टित विशिष्ट अध्यापन पद्धती, सौंदर्यविषयक दृष्टी, संवेदनक्षम विचारांचा विकास सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन इ. ने विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. उद्याचा आणि आजचाही विद्यार्थी नवीन विचारांचे अनुकरण करणारा आहे. त्यांच्यात स्वत्व निर्माण करणे, आपलेपण टिकवण्यासाठी आपले व्यक्तिमत्त्व खुलविणे शिक्षकांच्या हाती आहे. परिस्थितीसापेक्ष माहितीचे ज्ञान आणि भान शिक्षकांनी ठेवावे. शिक्षक म्हणजे सर्वज्ञ वा ब्रह्मदेव नव्हे पण विद्यार्थ्यांच्या प्रत्येक शंकेचे निरसन करण्याची, अचूक उत्तरे देऊन त्यांचे समाधान करण्याची प्रत्येक शिक्षकांची तयारी असली पाहिजे. इतक्या ज्ञानाची शिदोरी आपण नेहमी जवळ बाळगली पाहिजे. वद्विवंत शिक्षक विद्यार्थ्यांच्या नजरेत नेहमी आदर्श असतो. अशा आदर्श व्यक्तिमत्त्व संकल्पनेतूनच आपल्या सारखा शिक्षक आपण निर्माण करू शकतो. पण त्याचबरोबर अभ्यासू वृत्ती प्रगाढ वाचन, इतर सर्व विषयांचे प्राथमिक ज्ञान, स्वत:च्या विषयाचे सखोल वाचन असावे. शिक्षकाकडे विद्यार्थ्यांना समजून घेण्यासाठी मातेची माया व पित्याचा कठोरपणाही प्रसंगी असावा. सर्वच थरातील विद्यार्थ्यांना प्रेमाची, मायेची भाषा लवकर कळते. पौगंडावस्था ते तारुण्य या निर्णायक काळातून जाताना आजचा तरुण विद्यार्थी झगमगाटाला, अनाठायी आकर्षणाला बळी पडत आहे. त्याला समजावून घेऊन त्यांच्या तलाच एक असे भासविणारा, प्रसंगी मित्र

म्हणून मदत करून त्यांना योग्य दिशा दाखविणारा, भरकटलेल्या नौकेचे सुकाणु आपल्या समर्थ हाती पेलणारा, दिशादर्शक शिक्षक आज समाजाला अपेक्षित आहे. आपली शाश्वत मूल्ये टिकविणे शिक्षकांच्याच हाती आहे. त्यासाठी शिक्षणामध्ये परिवर्तन होण्याची आवश्यकता आहे. पण परिवर्तनाची दिशा निश्चित नाही. आपल्याकडे असणारा उपलब्ध कार्यकाल व साधनसामग्री खूपच कमी आहे, अपुरी आहे. या कक्षेतच विद्यार्थ्यांना शैक्षणिक अनुभव देताना ते अधिकाधिक अर्थपूर्ण व्हावेत असा प्रयत्न झाला पाहिजे.

२१ व्या शतकातील विविध बदलांचा परिणाम म्हणून विद्यार्थी आक्रमक, स्वार्थी, अविचारी, हक्क व संघर्ष यासाठी सतत प्रयत्नशील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांना पुराणकथा 'कथाच' वाटतील. 'भगिरथ प्रयत्नाचा' अर्थ त्यांना समजणार नाही. निष्ठेचे महत्त्व त्यांना कळत नाही. प्रसारमाध्यमामुळे झटपट श्रीमंत होण्याचे मार्ग चोखाळले जातात. भौतिक लालसेसाठी वाटेल ते कृत्य केले जाते. शिक्षण उपजिविकेचे माध्यम मानले जाते. व्यवसाय वा नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण ही संकल्पना बदलली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनात बदल झाला पाहिजे. देशाची खरी संपत्ती म्हणजे बुद्धिवंत विद्यार्थी / नागरिक होय. म्हणून समाजपरिवर्तनाचे वारे सर्वप्रथम शिक्षणपद्धतीत वाहू लागले पाहिजेत. भारत एक शोधाची जननी आहे. बौद्धिक संपत्तीचा अमूल्य अन् अमाप साठा भारतात आहे, याची माहिती विद्यार्थ्यांना असावी. भारत हा सर्वांकडून घेणारा देश आहे, हा विद्यार्थ्यांच्या मनातील गैरसमज दूर झाला पाहिजे. शून्याचा शोध, भास्कराचार्य, सत्येंद्रनाथ बोस, जगदिशचंद्र, विवेकानंद असे अनेक थोर विचारवंत भारतात झाले. सत्येंद्रनाथ बोस यांचे नाव आईनस्टाईन बरोबर घेतले जाते मग आज छोट्या पेटंटसाठी भारतीय ज्ञान का नाकारलं जातं ? मी त्याविरुद्ध उभा राहीन, कारण माझे/आपले आहे अशी मानसिकता, आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे, आपली संस्कृती कर्तव्य मानते. पाश्चात्य लोक हक्क व संघर्ष श्रेष्ठ मानतात. त्यांना साध्या सोप्या उदाहरणांनी आपले विचार, मते, चांगले वाईट यातील फरक समजावून सांगितला पाहिजे. नववर्षाची सुरुवात भारतीय सौरवर्ष, गुढीपाडव्याने व्हावी, शुभेच्छापत्र स्वतः तयार करण्यास प्रवृत्त करावे, त्यामुळे सृजनशीलता वाढीस लागेल. शिक्षणातून समाजाचे भले व्हावी, असे हितचिंतक तयार व्हायला हवेत. नववर्ष सुरुवात जुन्या वर्षाची प्रतिमा जाळून करु नये, तर 'जुने ते सोने' त्याच्या स्मृती जपून ठेवून करावे. आपण इतिहास शिकतो पण इतिहासापासुन काहीच शिकत नाही, याची जाण विद्यार्थ्यांत जागृत व्हावी, स्वदेशप्रेम, सहकार्यभावना, एकात्मता अनेक उदाहरणांनी प्रसंगांनी ज्वलंत ठेवली पाहिजे.

विविध संपर्क माध्यमामुळे आकर्षक, लक्षवेधी जाहिरातींमुळे, इंटरनेटसारख्या अत्याधुनिक सेवांमुळे विद्यार्थ्याला हवी असलेली (अन् नको असलेलीही) माहिती त्वरित मिळते. त्यामुळे या माध्यमांचा प्रभाव त्याच्यावर अधिक पडतो. त्यामुळे उद्याचा विद्यार्थी वर्गात येताना बरोबर पुष्कळ माहिती व ज्ञान स्वतःबरोबर घेऊनच येईल, अशावेळी त्याला नेहमीचे शिक्षण कंटाळवाणे वाटेल, त्यासाठी शिक्षकांनी प्रसार माध्यमापेक्षाही आपले व्यक्तिमत्त्व व शिकवण्याची कला प्रभावी करण्याची गरज आज भासू लागली आहे. शिक्षकांनी आपली वृत्ती नेहमी विधायक (पॉझिटिव्ह) ठेवावी. नवीन शतकातील बदलाबरोबर शिक्षणही प्रगल्भ असावे. कारण शिक्षणाशिवाय ज्ञान व शहाणपण व्यर्थ आहे. तसेच प्रसारमाध्यमाचा एक मोठा दुष्परिणाम म्हणजे झटपट श्रीमंत होण्याची लालसा, वृत्ती आज निर्माण होत आहे. त्यामुळे निष्ठेचा, प्रामाणिकपणाचा अभाव असेल तर ज्ञान व शहाणपण गहाण टाकले जाईल, अशी भीती वाटते, किंबहुना ज्ञानाचा वापर वाम मार्गाने होण्याचीही शक्यता

नाकारता येणार नाही, म्हणून जीवदायी ज्ञान निवडण्याची, वाढविण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी. प्रसार माध्यमामुळे, माहिती व तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळणार आहे. ज्ञानात भर पडेल पण त्याचबरोबर काही सुप्त भावनाही चाळवतील. त्यांना योग्य मार्गदर्शन करून योग्यवेळी त्यांच्या विचारांना वळण लावण्याचे काम शिक्षकांचेच आहे.

शिक्षण ही यांत्रिक प्रक्रिया नाही. शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांचा संबंध येतो. त्यांच्यात अंतरक्रिया होते. अध्ययनाबरोबरच आपले अनुभव, विनोदी घटना, शाब्दिक कोडी इ. अनेक इतर गोष्टींचा वापर करून शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात ज्वलंत देशप्रेम, निष्ठा, काहीतरी करण्याची प्रेरणा, मोठेपणी कुणी आदर्श बनावे, याचे स्वप्न जागृत ठेवण्याचे कार्य शिक्षक सहजसुंदर सोप्या पद्धतीने करू शकतो, त्यासाठी शिक्षक व विद्यार्थी अधिक जवळ आले पाहिजेत. त्यांच्यातील अध्ययन, अध्यापन प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे. त्यासाठी शिक्षकांचा व्यासंग मोठा हवा. विविध पैलूदार वक्तृत्वामुळे, आकर्षक भाषाशैलीने विद्यार्थी प्रभावित झाल्यास शिक्षक विद्यार्थीप्रिय बनतो. परिणामी विद्यार्थ्यांला योग्य मार्गदर्शन करणे, दिशा दर्शविणे, आदर्श समोर ठेवणे सोपे होईल.

आजचे जीवन सर्वांसाठीच धावपळीचे व खूप धकाधकीचे, संघर्षाचे बनले आहे. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांला व्यायामाचे महत्त्व, योगासने, क्रीडास्पर्धा इ. तून खेळाचे महत्वसुद्धा पटवून दिले पाहिजे. जर विद्यार्थी निरोगी असेल तर त्याच्याकडे खिलाडू वृत्ती असेल तर त्याला परिस्थितीचे अचूक ज्ञान व भान राहील. चपळता, तत्परता, अचूक निर्णयक्षमता, लक्षवेधी शक्ती, जीवनात यशापयश समर्थपणे पेलण्याची कला, त्याला अवगत होईल. थोड्याशा अपयशाने खचून जाऊन आत्मघात करून घेण्याची वृत्ती, मनाचा कमकुवतपणा, खिलाडूवृत्तीमुळे नाहीसा होईल. म्हणून शिक्षणाबरोबर उद्या येणाऱ्या नवीन काळात विद्यार्थी कमजोर राहू नये, भित्रा असू नये, संकुचित वृत्तीचा नसावा, यासाठी विविध पातळीवर प्रयत्न करणे शिक्षणानेच साध्य होईल.

शिक्षकाप्रमाणे विद्यार्थ्यांचे पालक, शाळा, परिसर, मित्र इ. ही विद्यार्थ्यांच्या यशाचे साथीदार असतातच पण आज परिस्थितीच अशी आहे की आई व वडिल मोठा भाऊ बहिण जनसमूहस्पर्धेत टिकून राहण्यासाठी अर्थार्जन करतात, अशावेळी काही मुले कुढी बनतात तर काही मुलांवर मानसिक दुबळेपणामुळे इतर विपरित प्रवृत्ती तावा मिळवितात तर काही आक्रमक बनतात. कोवळ्या वयात त्यांना गोंजारून प्रेमाने त्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्याची सामाजिक जबाबदारी शिक्षकांचीच आहे. त्यांना प्रेमाची, कौतुकाची पाठीवरील थाप हवीशी असते पण दिवसभराच्या कष्टाने, थकलेल्या, कर्तव्यात दबून गेलेल्या आई-वडिलांना बऱ्याचदा मुलांशी गप्पा मारण्यास वेळही नसतो. त्यासाठी शिक्षण क्षेत्र हे पवित्र मंदिर व्हावे.

उत्तम संस्काराधिष्टित कार्यक्रम पहाण्यास त्यांना प्रवृत्त करावे, फॅशनचे वाढत जाणारे वेड आपण थोपवू शकत नाही, पण 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' या उक्तीचा आपण विद्यार्थ्यांपुढे आदर्श ठेवावा. यश मिळविण्यासाठी मेहनत, प्रयत्न, सराव हा एकच योग्य मार्ग आहे, हे पटवून देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी, त्यांना सभाधीटपणा येण्यासाठी सतत प्रयत्न झाले पाहिजेत. कारण एक दिशाभूल एक जीवनच नव्हे तर संबंधित अनेकांचे जीवन धोक्यात आणणारी ठरेल. त्यासाठी शिक्षकांना खऱ्या अर्थाने स्वतःचे कसब वापरावे लागेल. भौतिक सुखाची परिसीमा गाठण्याचे प्रयत्न सर्वच करतील. जे मुळात हुशार, स्वयंप्रकाशित, स्वकर्तृत्वावर विश्वास व प्रामाणिकपणा असणारे विद्यार्थी इतरांच्या मदतीशिवाय उच्चशिखर मिळवितात पण माहिती तंत्रज्ञानाच्या वापराने गोंधळलेल्या, दिशाहीन झालेल्या विद्यार्थ्यांच्या विचाराची

(पान क्र. १७ वर)

# साहित्य विश्व

*ग्रंथ प्रसारक शरद जोशी यांनी दिलेली ही माहिती - संपादक*

## महाराष्ट्र परिचय सूची

कोलकत्याचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत कुलकर्णी (५४, बकुल बागान रोड, भवानीपूर, कलकत्ता ७०००२५) यांनी १९९४ मध्ये ही सूची प्रथम प्रसिद्ध केली. १९९९मध्ये त्याची दुसरी आवृत्ती (पृ. ८०, मूल्य रु. १३०/- + पोस्टेज रु. २०/-) प्रसिद्ध केली आहे. या सूचीत उत्तर भारत, मध्यभारत, पश्चिम भारत, दक्षिण भारत व पूर्व भारत अशा विभागातून सुमारे ४०० संस्थांची माहिती व सुमारे ७० संस्थाचे पत्ते देण्यात आलेले आहेत.

बृहन्महाराष्ट्रातील मराठी विभाग असलेली काही महत्त्वाची ग्रंथालये, नियतकालिके, मंदिरे, सहकारी संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, वधू-वर सहाय्यासाठी संपर्काचे पत्ते, मराठी शिक्षण संस्था, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने (अर्थातच बृहन्महाराष्ट्रातील), 'महाराष्ट्रात इतर भाषिक व इतर प्रांतात मराठी भाषिक', 'लोकसंख्येचा तुलनात्मक तक्ता', 'मराठी भाषिकांची लोकसंख्या', 'महाराष्ट्रातील महत्त्वाचे संपर्क पत्ते' व 'विदेशातील मराठी संस्थांचे पत्ते' इ. प्रकरणातून विविध प्रकाराची माहिती देण्यात आली आहे त्यामुळे ही सूचीही संग्राह्य ठरली आहे. श्री. सूर्यकांत कुलकर्णी यांनी अथक परिश्रम घेऊन ही सूची बृहन्महाराष्ट्र मंडळ (नवी दिल्ली) प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध केली आहे. उभयतांचे खास अभिनंदन.

## मराठी भाषेची स्थिती आणि गती

श्री. दादासाहेब लोणकर यांनी त्यांच्या साहित्य कलायात्री प्रकाशन संस्थेतर्फे (कलायात्री भवन, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११०३६, दूरध्वनी - ६८१६०८४, फॅक्स - ९५२०-६८१६०८४) प्रसिद्ध व्यासंगी प्राध्यापक डॉ. मधुकर गणेश मोकाशी ('श्री मायबोली', बंगला नं. १८, गजानन सोसा., दौंड, जि. पुणे - ४१३८०१) यांचा 'मराठी भाषेची स्थिती आणि गती' (संदर्भ ग्रंथ) हा ग्रंथ (पृ. १६४, मूल्य रू. १३०/-) २६-१-२००१ रोजी प्रसिद्ध केलेला आहे.

डॉ. मोकाशी हे मराठीचे प्राध्यापक आहेत. (दौंड येथील दौंड तालुका कला आणि वाणिज्य महाविद्यालयात) मराठी भाषेचा त्यांचा व्यासंग मोठा आहे. निरनिराळ्या नियतकालिकांतून, स्मरणिकांतून संपादित ग्रंथांमधून त्यांनी विविध प्रकारचे स्फुट लेखन केले आहे. अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. अनेक चर्चासत्रांमधून भाग घेतलेला आहे. ग्रामीण परिसरात संदर्भ ग्रंथ व अद्ययावत माहितींचा खजिना सहजासहजी उपलब्ध होत नाही. त्यासाठी बरीच यातायात करावी लागते. मराठी वाचकांना अशी माहिती उपलब्ध व्हावी म्हणून त्यांच्या विविध लेखांचे /निबंधांचे संकलन प्रस्तुत पुस्तकात करण्यात आलेले आहे. ('महाराष्ट्र आणि मराठी भाषा - नामनिर्देश व गौरव गीते', 'मातृभाषा मराठी - आमचा मान आमचा अभिमान', 'मराठी भाषेची सद्यस्थिती', 'शोधनिबंध' व परिशिष्ट संदर्भसूची या प्रकरणांतून)

डॉ. मोकाशी यांचे बरेचसे लेखन आध्यात्मिक व संत साहित्यविषयक आहे. 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।' या समर्थांच्या वचनाप्रमाणे तसेच 'अमृताते पैजा जिंकणाऱ्या' ज्ञानेश्वरांच्या मायबोलीबद्दल त्यांना तळमळ आहे. त्यांचेच फलित म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ.

डॉ. कल्याण काळे यांची विवेचक प्रस्तावना या ग्रंथास लाभलेली आहे.

### व्याख्याता सूची

महाराष्ट्रात लोकशिक्षण व प्रबोधनाचा झरा वाहता ठेवण्याच्या कामी विविध व्याख्यानमालांच्या रूपाने मोठा हातभार लागलेला आहे. गावोगावी नियमितपणे चालणाऱ्या व प्रसंगी कार्यकर्त्यांनी पदरमोड करून चालविलेल्या विविध व्याख्यानमाला हे मराठी संस्कृतीचे वैभव आहे. विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांना चांगल्या वक्त्यांची माहिती नेमकेपणाने उपलब्ध व्हावी, या दृष्टिकोनातून मोहन वसंत वैद्य (प्रकाशन विश्व, सी-१२, हर्षदा गार्डन, १२७/२, महागणेश कॉलनी, पौड रोड, कोथरूड, पुणे - ४११०२९. दूरध्वनी - ५३८३११०) यांनी ५-९-२००१ रोजी एक उत्कृष्ट 'व्याख्यातासूची' (पृ. १५५, मूल्य रु. १००/-) प्रसिद्ध केलेली आहे.

या सूचीमध्ये व्याख्याते, राजकीय क्षेत्रातील वक्ते, कीर्तनकार-प्रवचनकार, निवेदक, सूत्र संचालक, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, सामाजिक-सामाजिक संस्था वक्तृत्व-कथाकथन स्पर्धा अशी प्रकरणे असून त्यामधून अनुक्रमे सुमारे ३५०,६०,१५०,२५, १६०, २००, १५० व ६० व्यक्ती-संस्था-व्याख्यानमाला इ. चे पत्ते दिलेले आहेत. सामाजिक कार्यकर्ते, सांस्कृतिक संस्था इ. ना ही सूची अत्यंत उपयुक्त अशी आहे. ही सूची तयार करण्यात मोहन वैद्य यांना अनेकांचे सहकार्य लाभले आहे. श्री. वैद्य यांचे अभिनंदन.

### वक्ता-विषय सूची

अशाच प्रकारची एक उत्तम सूची महाराष्ट्र सार्वजनिक व्याख्यानमाला समन्वय समिती (टिळक स्मारक मंदिर, टिळक पथ, पुणे -४११०३०, दूरध्वनी - ४३३९००५) यांनी २० मे ९५ मध्ये प्रथम प्रसिद्ध केली होती. एप्रिल २००० मध्ये त्याची द्वितीय आवृत्ती प्रसिद्ध केलेली आहे. या आवृत्तीचे संकलन डोंबिवलीचे प्रख्यात ग्रंथपाल डॉ. हेमंत टिळक (शारदा सदन, गुजराती हायस्कूलसमोर, डोंबिवली (पू.) - ४२१२०१) यांनी केले आहे.

या सूचीत कै. जयंतराव टिळक, डॉ. वसंत गोखले व संकलक डॉ. हेमंत टिळक यांची सूचीविषयी माहिती देणारी मनोगते आहेत. या सूचीमध्ये (पृ. ९६, मूल्य रु. ५०/-) असलेली प्रकरणे अशी - 'वक्ता सूची' (यात ६८७ वक्त्यांचे पत्ते आहेत.) स्वातंत्र्यवीर सावरकर दालन (यात १३८ वक्त्यांचे पत्ते), काही वेगळे विषय व वक्ते, परिसंवादातील विषय व सहभागी मान्यवर (यात ४१ विषय व अनेक वक्त्यांची नावे), वेगळे विषय-वेगळे कार्यक्रम (संख्या ५४) 'मुलाखती घेण्याजोग्या मान्यवर व्यक्ती' (संख्या सुमारे ९०), 'मुलाखती घेणाऱ्या मान्यवर व्यक्ती (सुमारे ५०), विषय व वक्ते पूरक संदर्भांक, व्याख्यानमालेसाठी मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्रातील सार्वजनिक व्याख्यानमाला संस्थांची नावे व पत्ते (संख्या सुमारे १२५) या सर्व प्रकरणातून दिलेली माहिती उपयुक्त आहे. त्यामुळे ही सूचीही संग्राह्य ठरली आहे.

व्याख्यान म्हणजे वक्ता व श्रोता यांच्यातील सुसंवाद. आपल्या ज्ञानामध्ये महत्त्वाची भर घालण्याचे व आपल्याला सुसंस्कृत करण्याचे महत्कार्य व्याख्याने करीत असतात. गेल्या काही वर्षांपासून या व्याख्यान संस्कृतीला ओहोटी लागल्याचे दिसत आहे. पुण्यासारख्या संस्कृतीचे माहेरघर असणाऱ्या ठिकाणी सुद्धा अपवाद वगळता व्याख्यानांना तुरळक उपस्थिती असते. ही स्थिती योग्य नाही ही व्याख्यान संस्कृती कशी जोपासली जाईल यासाठी प्रत्येक मराठी माणसाने अधिकाधिक प्रयत्नशील रहावे.

- शरद जोशी
(ग्रंथप्रसारक)

•••

# श्री मंगल मूर्तये नमः

*गणेश चतुर्थीचे औचित्य साधून सदर अभ्यासपूर्ण लेख देत आहोत. - संपादक*

**गणेशपूजा -**

हिंदूंचा एक पूजनीय देव. प्रत्येक मंगल कार्याच्या आरंभी त्याची पूजा केली जाते. न ऋदते (त्वत् क्रियते) किंचनारे महामर्के मघनन् चित्रगर्च । तुझ्या वाचून हे देवा कोणतेही कार्य होऊ शकत नाही. इतके महत्त्वाचे स्थान हिंदू समाजात गणपतीला प्राप्त झाले आहे. भारतात गणेशाची असंख्य स्थाने आहेत. त्या त्या स्थानात विविध प्रकारच्या मूर्ती तेथे आढळतात त्या देवतेची पूजा केव्हा कुठे सुरू झाली याबद्दल एकमत झालेले दिसत नाही. पण एक गोष्ट निर्विवादपणे सांगता येईल की गणपती अथर्वशीर्ष जितके प्राचीन असू शकेल तितकी गणपती पूजा प्राचीन मानावी लागेल.

**काही विद्वानांची मते**

काही विद्वानांनी यासंबंधी विचार मांडलेले आहेत. त्याचाही बोध करून घेणे योग्य ठरेल. पुण्याचे प्राच्य विद्या अभ्यास मंडळाचे संस्थापक श्री. भांडारकर यांच्या मते याची सुरुवात खिस्तोत्तर ५ वे ते ८ वे शतक असावे. म. म. मिराशी (नागपूर) यांच्या मते १० व्या शतकापूर्वी गणेशपूजा प्रचलित नसावी. श्री मधुकर ढवळीकर यांनी पुण्याच्या रविवार, सकाळ १०.९.१९७२ च्या अंकात असे विधान केलेले आहे. त्यांनी काही दाखल्यावरून असे म्हटले आहे खिस्त शक ८६२ साली जोधपूर जवळ घटियाला ग्रामी एक स्तंभ कोरलेला आहे.



त्यात प्रथम गणेशाला नमन केलेले आहे. वराह मिहिर, बृहत् संहिता (६ वे शतक) यात गजाननाच्या ध्यानाचे वर्णन आहे. खिस्त शक ४ थ्या व ५ व्या शतकात गणेशाच्या मूर्ती अफगाणिस्नतानात आढळलेल्या आहेत. गादज येथील एक मूर्ती दर्गापीर रतननाम येथे ठेवण्यात आलेली आहे. या मूर्तीची प्रतिष्ठापना शाही वंशातील किंगल राजाने केली होती. हे त्यावरील कोरीव लेखनावरून ध्यानात येते. एक मूर्ती शंकरधार येथे सापडली. ती मूर्ती गांधार शिल्पाची आहे. यावरून ती ४थ्या शतकातील असावी असे वाटते. त्याकाळी अफगाणात गणेशपूजा प्रचलित असावी. एक चिनी प्रवाशी चार महिने अफगाणात होता. कपिशा नगरीत हत्तीच्या देवता त्याने पाहिल्या. त्या मूर्तीला तेथील लोक पिलूवार असे म्हणत. हे चित्रण इंडोग्रीक राजा युक्रेटायरिस (खिस्तपूर्व १८०) याच्या नाण्यावर आढळते. खिस्त शक १ ल्या व २ऱ्या शतकात कुशाण वंशाच्या काळी गजमुखी गणेशमूर्ती प्रथम निर्माण झाली. पुढे ६ व्या शतकात बौद्ध धर्मियांनी मध्य आशिया व चीनमध्ये या देवतेचा प्रसार केला. यानंतर भारतात प्रसार झाला. पिलुशार हे नाव दक्षिण भारतात आजही प्रचलित आहे. तामिळ भाषेत गणेशाला पिल्लैवार असे म्हणतात. गणेश पूजा गांधारात प्रसिद्ध पावली असे सिद्ध होते.

**गणपती -**

वेदातील एक प्रमुख देवता. शरीर मानवाचे व शीर मात्र हत्तीचे. गणेश हा भारतातील एक प्राचीन देव. मात्र

काही संशोधकानी ही आर्येतर देवता असावी असे म्हटले आहे. पूर्वकाळी काही मानव समूह हत्तीची पूजा करत असत. त्यावरून गणेशपूजा विकसित झाली. झाडाखाली त्याची पूजा करत व प्रसंगी नरबळी देत असत. त्याच्या रक्ताने शरीर माखत असत. सांप्रत शेंदूर फासले जाते. काही काळानंतर वैदिक मंत्रानी पूजा सुरू झाली. तेव्हाच ही वैदिक देवता झाली. ऋग्वेदातील ब्रह्मणस्पति सूक्तात - गणपतीचे आवाहन केले आहे. गणानां त्वा गणपतिं हवामहे । हा देव शिवगणाचा प्रमुख झाला. कालांतराने तो शिवपुत्र असल्याचे ठरविण्यात आले.

**गणेश कोश - अमरेन्द्र गाडगीळ**

त्या कोशात गणेश संबंधीची साग्र माहिती उपलब्ध होते. खालील पुराण ग्रंथातून गणेशासंबंधी माहिती मिळत असल्याचे लेखकाने नमूद केले आहे.

१) श्री गणेश पुराण दोन खंडातून उपासना खंड व क्रीडा खंड

२) मुद्गल पुराण - एकूण नऊ खंड

३) पद्म पुराण - अध्याय ६१, ६२, ६३

४) भविष्य पुराण - ३१,३२ सिद्धिविनायक व्रतकथा

५) वराहपुराण - अध्याय २३

६) लिंग पुराण अध्याय - १०४, १०५

७) शिवपुराण अध्याय - १३ ते १९ व २१

८) गरूडपुराण अध्या - १५

९) ब्रह्मपुराण अध्याय - ३९

१०) ब्रह्मवैवर्तपुराण अध्याय - १ ते २० व २४ ते ४६

११) स्कंद पुराण अध्याय ५५ ते ५७ स्यमंतक उपाख्यान

१२) अग्निपुराण - अध्याय ७१, १७२, ३१३, ३१८, ३४८

१३) ब्रह्मांड पुराण अध्याय १ ते ५

१४) सौरपुराण, अध्याय ४३

१५) विष्णुधर्मोत्तर पुराण अध्याय १०४

१६) भविष्योत्तर पुराण - अध्याय २

१७) नारदपुराण-पूर्वभाग द्वितीयपाद अध्याय - ५१, तृतीयपाद अध्याय -६५,६६, चतुर्थपाद अध्याय१४३

वरील पुराणांखेरीज काही इंग्रजी, हिंदी, गुजराथी आणि मराठी भाषेतूनही ग्रंथ लिहिले गेले आहेत. काही मराठी ग्रंथांचा उल्लेख खालीलप्रमाणे -

१) चिंतामणि विजय - ले. कवि धुंडिदास

२) गणेश पुराण - मराठी भाषांतर ले. विष्णूशास्त्री बापट, याच पुराणाचे ओवीबद्ध मराठी ग्रंथ ले. बलभीम मोरेश्वर भट.

३) गणेश प्रताप - ले. विनायक महादेव नातू

४) गणेश प्रभाव - प्रकाशक श्रीपात नारायण सातपर

५) गणेश लीलामृत - प्रकाशक नारायण रामचंद्र सोहनी

६) गणेश विजय - ओवीबद्ध योगींद्राचार्य महाराज, मोरगाव

७) गणेश विलास - ले. एकनाथ महाराज

८) श्री गणेश शारदा सद्गुरु - ले. सदाशिव कृष्ण फडके

९) श्री मंगलमूर्ती श्री गणेश ले. पु. रा. बेहरे

१०) मंगलमूर्ती गणेश - पं. श्री. दा. सातलेकर

११) मुद्‌गल पुराण - मराठी भाषांतर चिंतामण गंगाधर भानू ओवीबद्ध - डॉ. सी. ग. देसाई

१२) गणपति चरित्र (मुलासाठी) ले. अ. शं. अग्नीहोत्री

१३) गणेश स्थानवर्णन - अष्टविनायक ले. सदानंद चेंदवणकर

१४) श्रीमद् योगीन्द्रविजय - ले. योगींद्र महाराज

वरील ग्रंथ यादीवरून गणेश देवतेसंबंधी किती विपुल माहिति उपलब्ध आहे हे ध्यानात येईल.

**गणपती देवता विषयक माहिती -**

गणपती अयोनिज आहे (ब्रह्मवैवस्तत पुराण व लिंगपुराण)

१) शिवाने आपल्या तपश्चर्येने एक सुंदर बालक निर्माण केला. पार्वतीला हा अपमान वाटला. आपल्या साहायावाचून बालक निर्माण केला आहे हे पाहून बालकाला शाप दिला. त्यामुळे तो बालक बेडौल गजमुख झाला.

२) एकदा पार्वती स्नान समयी आपल्या अंगच्या मळाने एक पुरुष बनविला. त्याला द्वाररक्षक म्हणून बसविला. शिवाला आत जाण्यात त्या पुरुषाने मज्जाव केला. रागाने शिवाने त्याचे मुंडके उडविले. पार्वती शोक करू लागली. शिवाने त्याला हत्तीचे मुंडके लावून सजीव केले (शिवपुराण).

३) एकदा गजांची जलक्रीडा शिव व पार्वतीने पाहिली. लगेच उभयता गजरूप होऊन क्रीडा करू लागले आणि त्यातून गजाननाचा जन्म झाला.

याप्रमाणे गजानन या नावाच्या मागे काहीना काही रहस्य दडलेले आढळते. गणपतीची विशिष्ट नावे व त्या मागील रहस्य.

१) **एकदंत** - एक दात मोडलेला. दातच आयुध म्हणून आपल्या एका हातात गणेशाने घेतला आहे. तो मोडल्याची कारणे -

अ) शंकराने क्रुद्ध होऊन त्याचा एक दात मोडला.
ब) परशुरामाने युद्धात त्याचा एक दात मोडला.
क) विनायक अवतारात देवांतकाशी युद्ध करताना त्याचा एक दात मोडला. त्याच मोठ्या दाताने त्याचे मस्तक विदीर्ण केले. त्यावरील रूपक - गणपती कृषी देवता. तो शेतीचे रक्षण करतो. आपल्या कानांनी धान्यावरील कीड झटकतो. एक दात म्हणजे शेतीचे मुख्य अवजार - नांगराचा फाळ होय.

२) **विनायक** - हे एक त्याचे लोकप्रिय नाव. लोकात विघ्ने निर्माण करण्यासाठी. विधात्याने त्याला निर्माण केले. - सहा विघ्नकारी मित, संमित, शाल, कटङ कशी, कूष्मांडी, राजपुत्र. विनायक गण क्रूट व उपद्रवी असल्याने त्याना शांत करण्याचे अनेक उपाय सांगितले आहेत. या विनायक गणाची बाधा नष्ट करण्यासाठी धर्मशास्त्रात अनेक शान्तिविधी सांगितलेल्या आहेत. गणपति विनायकांचा अधिपति. शंकर त्याला म्हणाले तुझी प्रथम आपण होऊन कार्यारंभी जो पूजा करणार नाही त्याच्या कार्यात तू विघ्ने आण. तेव्हापासून कार्यारंभी प्रथम गणपती पूजन होऊ लागले.

३) **मूषकवाहन** -गणेश पुराणातील कथा. एकदा एका गंधर्वाचा वामदेवास चुकून पाय लागला. त्यामुळे 'तू मूषक हो' असा त्यानी त्याला शाप दिला. तो उंदिर झाला. तो पराशर ऋषींच्या आश्रमात शिरला. तेथील सर्व धान्य फस्त केले व तसेच त्याला सतावू लागला. पराशरांनी प्रार्थना केली. गणेशाने उंदरावर पाश

टाकला. तो शरण आला. गणेश प्रसन्न झाला व उंदराला म्हणाला, 'तू आजपासून माझे वाहन हो.'

या वरील रूपक - दिवसा पृथ्वी खाली लपणारा अंधार हाच मूषक. सूर्य मावळताच तो लपत छपत पृथ्वीवर येतो. सूर्य म्हणजेच गणेश. गणपती उंदरावर स्वार होतो याचा अर्थ सूर्य उगवताच अंधार त्याच्या खाली दबतो.

४) **गज** - याची व्युत्पत्ती - गणेशोपासना ही साक्षात् ब्रह्मविद्या मानली जाते. ग - लय, ज - निर्माण. गज हे उत्पत्ति लय तत्व असे मानले जाते.

५) **चिंतामणि** - चित्त क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र, निरोध प्रकारचे असते त्याना प्रकाशित करणारा तो चिंतामणि (मुद्गल पुराण)

६) **वक्रतुंड** - १) वक्र - माया तुंड ब्रह्म (एकनाथ महाराज)

२) वक्रान् - वाकडे लोकाना

७) **तुंडपति** - नाशयति इति वक्रतुंड: असाही अर्थ आहे.

चतुर्थी ही गणपतीची तिथी ही तुरिया अवस्था होय.

**दुर्वा, शमी, मंदार गणपतीला प्रिय का?**

या तीन वनस्पती गणपतीला प्रिय आहेत. दूर्वा - ब्रह्मदेवापासून निर्माण झालेली देवता. तिने तप केले. ती गणेशाला आवडली. तिला गर्व झाला म्हणून पार्वतीने शाप दिला. 'पृथ्वीवर तू तृणरूपाने रहा.' तिने शाप मिळविला. दूर्वा गणेशाच्या पूजनात वापरण्यात येऊ लागली. और्व ऋषीला शमिका नावाची मुलगी होती. धौम्य ऋषीला मंदार नावाचा पुत्र होता. मंदारशी शमिकेचा विवाह झाला. एकदा भृशुंड ऋषीची गाठ पडली. त्याचे स्वरूप पाहून त्या उभयताना हसू आले. भृशुंडीने त्यांना शाप दिला. 'तुम्हा उभयताना वृक्षयोनी प्राप्त होईल.' मग त्या उभयतांनी गणेशाची स्तुती केली. भृशुंडीचा शाप मला बदलता येणार नाही. मंदार वृक्षाखाली मी वास करीन व शमी पत्रे मला प्रिय होतील, असे त्यांना आश्वासन दिले.

**गणेशाच्या चार अवताराबद्दल -**

१) महोत्कट गणेश - जन्म कृतयुगात कश्यप व अदिती यांच्या उदरी. या अवतारात त्यांनी देवांतक व नरांतक या राक्षसांना ठार मारले. अशाप्रकारे धर्माचे रक्षण केले. वाक्चातुर्य, संघटन कौशल्य, युद्धनीती, शौर्यधैर्य हे गुण विशेष या अवतारात आढळतात. (गणेश पुराण)

२) गुणेश - त्रेतायुग - उमेच्या पोटी जन्म भाद्रपद शु. चतुर्थीला गुणेश जन्मला. त्याने सिंधू दैत्याला ठार मारले. सिद्धि, बुद्धि या ब्रह्मदेवाच्या कन्यकाशी विवाह केला.

३) गणेश - द्वापारात पार्वतीच्या पोटी - जन्मत:च कुरूप. तिने त्याला रानात टाकले. पराशराने त्याला सांभाळले. सिंदुरासुराचा वध केला.

४) कलियुगात जन्म होणे आहे.

गणेशपुराण क्रीडाखंड अध्याय १२८-१४८ पर्यंत गणेश गीता वरेण्य भक्ताला गणेशानी सांगितली. इथे वरेण्य विरक्त व मुमुक्षु व गणेश ज्ञानोपदेश करीत आहे.

या गीतेत योग साधना - कुंभक, रेचक, पूरक इत्यादी अंगे, पंचायतन पूजा, मानसपूजा, हे विषय आलेले आहेत. विभूतिवर्णन, विश्वरूप वर्णन संक्षेपाने आलेले आहेत. सांख्य, कर्म व ज्ञान योग याचे प्रतिपादन आहे.

**गणेश चतुर्थी** - भाद्रपत शुद्ध ४ हा उत्सव काही ठिकाणचा अपवाद वगळून सर्व भारतात साजरा होतो. याला वरद चतुर्थी असेही म्हणतात. ही चतुर्थी रविवारी वा मंगळवारी आल्यास विशेष माहात्म्य. या उत्सवात देश

परत्वे , कुळ परत्वे १, दीड, ३, ५, ७ दिवस वा अनंत चतुर्दशीपर्यंत गणेश पार्थिव पूजन, आरती मोदकांचा नैवेद्य असा केला जातो.

**गणेश पुराण -**

हे पुराण ब्रह्माने व्यासाना, व्यासानी भृगूना, भृगुनी सोमकांत राजाला कथन केले. उपासना क्रीडा असे दोन खंड या पुराणाचे आहेत.

उपासना खंड - गणेश महात्म्य, उपासनेचे विविध प्रकार, व्रत, वैकल्ये, पौराणिक कथा यात सोमकांताने आपल्या पुत्राला नीतीचा उपदेश केला आहे तो मननीय आहे.

गृत्समद, भृशुंडी यांच्या कथा आहेत. हे गणेश सांप्रदायाचे प्रवर्तक आहेत. गणेश सहस्त्र नामावली आहे.

क्रीडा खंड - चार अवतारांच्या कथा, गणेशाची अनन्यभक्ती सांगितलेली आहे.

कृतयुग - विनायक, सिंहारुढ, दशभुज, त्रेतायुग - मयुरेश्वर, मयूरारुढ, षट्भूज

द्वापार - चतुर्भुज मूषकवाहन कली धूम्रवर्म या नावाने अवतार घेणार.

**गणपती अथर्वशीर्ष -**

हे अथर्वण ऋषीनी लिहिलेले उपनिषद् आहे. या उपनिषदात - नमो व्रातपतये असे म्हटले आहे. व्रात्यांचा पति - यज्ञ न करणाऱ्या लोकाना आर्यांनी व्रात्य असे म्हटले आहे. त्यांचा पुढारी. संस्कारहीन द्विजाला व्रात म्हणतात. वर्ण संकटातून झालेली संतती. व्रात्य (बोधायन) गृत्समद गणपतीचे नाव आहे. मदस्राव होणाऱ्या हत्तीचा हा सूचक शब्द आहे. उपनिषद् कालची ही वर्णने असल्याने गणेश वैदिक देवता आहे याबद्दल शंका राहू नये.

ऋग्वेदात ब्रह्मणस्पति सूक्त आहे. ती देवता ज्ञानाची आहे. त्याच सूक्तात वर उल्लेखिल्याप्रमाणे 'गणानां त्वा' ही ऋचा आहे. वैदिक पूजा या मंत्रानीच केली जाते.

(ऋग्वेद २-२३-१)

अथर्वशीर्षात गणपति म्हणजे ब्रह्म व्यापक तत्त्व असे म्हटले असल्याने त्यात रुद्रदेवतेचाही उल्लेख आहे. तैत्तिरीय आरण्यकात रुद्र गायत्री व गणेश गायत्री यात साम्य आहे.

तत्पुरुषाय विद्महे वक्रतुंडाय धीमहि । इथे तत् पुरुष म्हणजे शिव.

**अथर्वशीर्षाचा थोडक्यात गोषवारा -**

हे ए छोटेखानी उपनिषद् आहे. अथर्व या शब्दाची फोड केली असता लक्षात येईल की थर्व म्हणजे चंचल, अथर्व म्हणजे शांत. शीर्ष म्हणजे डोके. हे डोके थंड ठेवण्याचे उपाय सांगणारे उपनिषद् आहे. डोके शांत ब्रह्मज्ञानाने होते. या उपनिषदात गणेशविद्या म्हणजे ब्रह्मविद्या सांगितलेली आहे. हे करत असताना सर्व उपासकाना उपयुक्त ठरावे व उपासना आबालवृद्धांना करता यावी, तसेच सर्व स्तरातील साधकाना सहज उपासना करता यावी अशी रचना आढळते.

सुरुवात ॐ नमस्ते गणपतये पासून त्वं ब्रह्मा त्वं विष्णु... भू र्भुवः स्वः ॐ इथपर्यंत निर्गुण निराकार ब्रह्माचे वर्णन आहे. निर्गुण उपासकाना अभिप्रेत भाग इथे आहे.

गणादीन् पूर्व इथपासून गणेश गायत्रीपर्यंत निर्गुण व सगुण उपासना बीजमंत्रासह व गायत्री मंत्रासह आहे. इथे प्रतीक उपासना आहे.

एकदन्तं चतुर्हस्तं इथपासून - शिवसुताय श्री वरदमूर्तये नमः पर्यंत. सगुण उपासना सांगितली आहे. थोडक्यात निर्गुण - निर्गुण - सगुण व सगुण अशा थरातील

सर्व साधकाना हे उपनिषद् उपयुक्त ठरते.

शेवटी फलश्रुती आहे. हे उपनिषद् ज्याना आवश्यक वाटते त्यानाच समजावून सांगावे अशिष्याय न देयं । जो कोणी याचे उल्लंघन करील स पापीयान् भवति असे म्हटले आहे.

या उपनिषदाची उपासना तीन प्रकारे करता येते. जप (अनुष्ठान) अभिषेक व याग या प्रकारे उपासना करून मनुष्य कल्याण प्राप्त करून घेऊ शकतो.

सहस्र आवर्तनाने जी कामना असेल ती पूर्ण करून घेता येते. मात्र त्या उपनिषदातील रहस्य कळून घेऊन सहस्र आवर्तने करावीत. पारायणाने काही साध्य होत नाही तर परायणाने सर्व काही साध्य होत असते हे लक्षात ठेवले पाहिजे. सहस्रावर्तन ही एक उपासना आहे. हे ध्यानात न घेता वेळेची बचत करण्यासाठी अर्थहीन उच्चारणाने काही उद्दिष्ट साध्य होत नाही हे ध्यानात ठेविले पाहिजे. अभिषेकाने मनुष्याला वाचासिद्धि प्राप्त होते. जो हजार मोदकासह गणेश याग करतो त्याला इच्छित वा वांछित सगळे प्राप्त होते. जो आज्य (तूप) व समिधा यानी यजन करतो तो सर्व काही प्राप्त करून घेतो. सूर्यग्रहणाच्या वेळी पवित्र नदीत गणेश प्रतिमेसन्निध जप केले असता त्याला मंत्रसिद्धी प्राप्त होते. तो मोठ्या विघ्नापासून, महत् पापापासून मोकळा होतो तो सर्व जाणणारा होतो. हे जाणून जो गणेशाची उपासना करतो तो सर्व गोष्टीतून मुक्त होऊन आनंद प्राप्त करून घेतो हे अथर्वशीर्षाचे फलित आहे.

सर्व गणेश भक्तानी, साधकानी यापासून आपले कल्याण साधावे.

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

(पान क्र.१ वरून)

## उद्याचा विद्यार्थी आणि शिक्षक

वावटळ, मनाची अस्थिरता समजून घेऊन, योग्य काय? अयोग्य काय? याचे मार्गदर्शनही आपण केले पाहिजे. चिरंतन, शाश्वत मूल्याची जोपासना करणे आज महत्त्वाचे आहे.

समाज जीवनाच्या विविध पैलूंचा पाया रचणे म्हणजे 'शिक्षण'. एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष चर्चिल यांच्याकडे शैक्षणिक बदलांवर ५ मिनिटे भाषण करावे असा आग्रह काही अमेरिकन नागरिकांना केला. तेव्हा विल्सन चर्चिल यांनी स्पष्ट नकार दिला ते म्हणाले, 'शिक्षण' या विषयावर ५ तासही माझ्यासाठी अपुरे आहे. समाजातील या महत्त्वाच्या विषयावर मी ५ मिनिटे काय बोलणार?

एका शिक्षकाने लावलेला ज्ञानदीप शतकानुशतके संक्रमित होतो. शिक्षण ही एक चिरंतन प्रक्रिया आहे, यासाठी उद्याचे विद्यार्थी ज्ञानी, बुद्धिमान, धाडसी, बेधडक व्यक्तिमत्त्वाचे असतील. शिक्षकाची भूमिका मात्र प्रेरक, प्रेरणा देणारी हवी. इतरांच्या सुख दुःखाची जाणीव इतरांबद्दल सहानुभूती, मानवतावादी दृष्टिकोन, स्वदेशी वस्तुंबद्दल प्रेम या भावना सुखी जीवनाची गुरुकिल्ली ठरतील, असा ठाम विश्वास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे आपल्या हाती आहे. विद्यार्थ्यांच्या मनात स्वत्व, अन्यायाविरुद्ध चीड ज्वलंत ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. तरच होणारे अनर्थही टळतील आणि प्रत्येकजणच वध्याची भूमिका घेणारा असणार नाही.

गरज ही कल्पकतेची जननी आहे, हे विसरून चालणार नाही.

**प्रा. सौ. मानसी मोहन जोशी**
एन्.के.टी.टी. ज्यु. कॉलेज,
खारकर आळी, ठाणे (प.)

•••

# श्रीमद्भगवत् गीता (अध्याय १८ वा) ।। मोक्षसंन्यासयोगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १८ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

'हे श्रीकृष्णा, संन्यास आणि त्याग (कर्मफल) यांचे वेगवेगळे तत्व जाणण्याची माझी इच्छा आहे.' अठराव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच अर्जुनाने विचारलेला हा प्रश्न म्हणजे एखाद्या गुणवत्तायादीत नेहमीच प्रथम येणाऱ्या हुशार बुद्धिमान विद्यार्थ्याने सर्व अभ्यास झालेला आहे तरी पुन्हा एकदा फेर उजळणी म्हणून काही करायचे राहिले नाही ना हे कळावे म्हणून गुरुला पुन्हा एकदा सर्व विषय थोडक्यात पहिल्यापासून सांगा म्हणून, म्हणावे तसा आहे. गुरुही विद्यार्थ्यांच्या यशाविषयी खात्री असल्यामुळे कळकळीने न कंटाळता पुन्हा सर्व विषय थोडक्यात समजून असे सांगेल तसेच भगवंताचे वर्तन आहे. परीक्षेला जाताना 'हे हे वाचलंस ना? सर्व तयारी केली आहेस ना? काही राहिलं नाही ना! सर्व घेतलंस ना?' असं मायेपोटी वत्सलतेनं विचारणाऱ्या माता-पित्याची व गुरुची भूमिका उत्तमरित्या इथे श्रीकृष्णाने बजावली आहे.



सुरुवातीला परीक्षेच्या हॉलवर गेल्यावर मी परिक्षेला बसतच नाही म्हणून ऐनवेळी कच खाऊन म्हणणाऱ्या हुशार विद्यार्थ्याला माता-पित्याच्या मायेनं गुरुच्या कर्तव्य कठोरतेनं चार उपदेशाच्या गोष्टी सांगून, प्रेमानं पाठीवरून हात फिरवून, थोपटून प्रसंगी थोडं रागावून, दादापुता करून परिक्षेला बसायला तयार करावं तशी माता पिता व गुरुची भूमिका पहिल्यापासून अखेरपर्यंत चोखपणे श्रीकृष्णाने पार पाडली आहे.

भगवद् गीतेचा हा अठरावा अध्याय हा गीता प्रासादाचा कळस आहे. 'संस्कार पुष्प'मध्ये जैन साध्वी प्रीती सुधाजी म्हणतात 'जीवन हा प्रसाद आहे तो घेऊन वरच्या प्रासादापर्यंत पोचा', त्यांचा आणखी संदेश आहे

'धूळ तोचि बुक्का । कर्म ते चंदन
अहोरात्र सेवा । हेचि हरीचे पूजन ॥'

ज्ञानदेवांनी या अध्यायाला 'एकाध्यायी गीताच' म्हटले आहे. म्हणजे गीतेचे सार या अध्यायात आले आहे. म्हणूनच अर्जुनाच्या प्रश्नास तत्वज्ञानाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. ज्ञानसंपन्न व्यक्तींसाठी 'संन्यास' व सर्व सामान्यांसाठी (अज्ञानी) 'कर्मयोग' अशी पूर्वीच्या लोकांची समजूत होती. ज्ञान व कर्म हे तम व प्रकाशवत एकमेका विरोधीच असतील तर त्यांचे एकत्र विवेचन भगवंताने का केले आहे? याचा उलगडा करून घेण्यासाठी वरील प्रश्न अर्जुनाने विचारलेला आहे.

शास्त्रविधीने नियत केलेली नित्य कर्मे अत्यंत श्रद्धेने आणि सात्विक बुद्धीने करावीत हेच भगवंताने सतराव्या अध्यायात कळकळीने सांगितले आहे. भगवंताचे सांगणे इतके मधुर, अमृतमय होते की तेच संपूच नये असे अर्जुनाला वाटत होते. म्हणून त्याग व संन्यास विचारण्याचे निमित्त करून ते गीतारुपी वस्त्र अर्जुनाने भगवंताला पुन्हा उलगडायला लावले आहे. वासरुच गाईला लुचावला

लागले तर गाईला पान्हा फुटायला वेळ तो काय लागणार! (ज्ञाने. १८. ८३ व ८४) साऱ्या उपनिषदांचे दोहन करून अत्यंत सकस असे दूध भगवंतानी अर्जुनाच्या निमित्ताने साऱ्या मानव जातीला प्यावयास दिले आहे. विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर पुढे जाऊन म्हणतात, 'पुन्हा सतरा अध्यायांचे सार काढून त्याची बासुंदी बनवून १८ व्या अध्यायाच्या रूपाने भगवंताने अर्जुनाबरोबर सर्वांपुढेच ठेवली आहे.' (गीतासागर) अर्जुनाला विषाद झाला म्हणून गीतेचा जन्म झाला. पहिल्या अध्यायापासून शेवटच्या अध्यायापर्यंत भगवंतानी आपला नि:श्वास जो वेद तो स्पष्ट करून सांगितला आहे.

सत्वगुणांच्या उत्कर्षानंतरच तत्वज्ञानाचा उदय होतो व तत्वज्ञानाच्या उदयानंतर कर्मसंन्यास वा फलत्याग शक्य होतो. हे गीतेने सांगितले आहे. संन्यासाने नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते. त्यागाने अमृतत्त्व (मोक्ष) लाभते. संन्यास आणि त्याग यांचा स्वरुपभेद जाणण्याची इच्छा अर्जुनाला झाली म्हणून त्याने प्रश्न केला -

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम ।
त्यागस्यच हृषिकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १८. १

संपूर्ण गीतेचे सार पुन्हा एकदा भगवंताकडून ऐकावे यासाठीच सर्व धार्मिक पोथ्यांमध्ये शेवटच्या अध्यायात पोथीची संगती सांगणारी 'अवतरणिका' दिलेली असते. हा अठरावा अध्याय म्हणजे गीतेची 'अवतरणिकाच' आहे.

भगवंत म्हणतात, 'अर्जुना, 'संन्यास व त्याग' या विषयावर विद्वानात मतभेद आहेत. प्रथम तुला मी इतरांची मते सांगतो ती ऐक.

* काम्य कर्माचा त्याग म्हणजे संन्यास - विद्वानाचे मत कर्माच्या फलाचा त्याग म्हणजे त्याग - पंडित लोकांचे मत

* सारीच कर्मे दोषयुक्त असतात म्हणून सर्व कर्म संन्यास हेच योग्य - काही विद्वानांचे मत

* यज्ञ-दान-तप ही कर्मे कधीही टाकू नयेत. ही वैदिक अनुशासनाने चालणारी कर्मे आहेत. ही कर्मे कशीही असली तरी आचरायलाच हवीत.

* काम्य कर्माचा त्याग, नैमित्तिक कर्मे करायलाच हवीत. फलाचा त्याग मात्र करावा. म्हणून काही कर्मांचा संन्यास व काही कर्मांचा त्याग हा अभिप्रेत आहे. - काही विद्वानांचे मत

अर्जुना, इतरांची मते ऐकलीस आता माझा ठाम निर्णय ऐक -

१) त्याग तीन प्रकारचा
२) यज्ञ-दान-तप या कर्मांचा त्याग करू नये. ती कर्मे केलीच पाहिजेत.
३) कारण ती चित्तशुद्धी करणारी कर्मे आहेत.
४) म्हणून ही कर्मे सुद्धा आसक्तीरहित केली पाहिजेत.
५) ती ज्ञानी व्यक्तीनेही टाकायची नाहीत. कारण ती लोकसंग्रह करणारी आहेत.
६) म्हणून सर्व कर्माचा (स्वधर्मप्राप्त कर्तव्य कर्म) संन्यास कुणीही करू नये.
७) फक्त ती फलाशा न धरता करावीत.

भगवंताने 'कर्मसंन्यास' या कल्पनेवरच प्रहार केला आहे. बालपणानंतर गृहस्थाश्रम न स्वीकारता एकदम संन्यास घ्यावा व भिक्षाटनाने उदरनिर्वाह करून ब्रह्म चिंतनात मग्न असावे असा हा सांख्यांचा संन्यासमार्ग होता.

ज्ञानी लोकांसाठी संन्यासाचा - ज्ञानमार्ग (योग)
अज्ञानी सामान्य लोकांसाठी - कर्ममार्ग (योग)

अशी ज्ञान व कर्मांची विभागणी करणारे तत्वज्ञान पूर्वीच्या काळी रुढ झाले होते.

भगवंत म्हणतात, नित्य नियत कर्माचा (म्हणजे स्वभावधर्माप्रमाणे नेमलेल्या कर्मांचा संन्यास) त्याग कोणासही योग्य नाही. सर्व जीवन कर्मांचा संन्यास (त्याग) ही कल्पनाच भगवंतास मान्य नाही. कुटुंब-समाज-देश यांच्याशी आपला काही संबंध नाही. त्यांच्याबाबत आपली काहीही कर्तव्ये नाहीत असे मानून कर्तव्ये टाकायची - टाळायची व वरती भगवी वस्त्रे परिधान करून ज्ञानी म्हणून मिरवायचे ! हाच मोह आहे.

१) मोहाने नियत कर्मांचा त्याग (संन्यास) हा - तामस त्याग

२) शरीराला कष्ट होतील म्हणून, दुःख होईल म्हणून जर कोणी कर्म सोडील तर तो - राजस त्याग. या दोन्हीलाही 'त्यागच' म्हणता येणार नाही.

३) नियत कर्मांचे आचरण त्यांच्या कर्तृत्वाच्या अहंकाराचा व फलाचा त्याग हाच सात्त्विक त्याग.

गीतेपूर्वी सांख्यांनी वेदांतील तत्त्वज्ञानाचा 'कर्मसंन्यासपर' अर्थ लावला होता. पण श्रीकृष्णाने कर्मसंन्यासावरच घाव घातला आणि सर्व जगाला 'कर्मयोगाचा' सुलभ सोपा मार्ग दाखवला. वेदांचा अर्थ 'कर्मपर' लावला. सर्वांनी कर्मे टाकली तर जग ठप्प होईल. ते पुढे चालणार नाही. भगवंताला तसे व्हायला नको होते म्हणून त्याने स्वतः सुद्धा कर्मे केली. लोकांना आदर्श म्हणून. कारण लोक माझे अनुकरण करतील म्हणून. जनकादिकांनीही कर्मे करूनच मोक्ष प्राप्त केला.

देहाला कर्म टाकणे शक्यच होणार नाही. बाह्य कर्मे टाकली तरी रुधिराभिसरण, श्वासोश्वास होणारच ना? ती कर्मे देह आहे तोवर संन्याशाला पण टाकता येणार नाहीत. (नुसते आळशासारखे बसणे हेही कर्मच !) मग कर्तव्यकर्मे का टाकायची? तुम्ही भिक्षा मागणार (हेही कर्मच) व उदरनिर्वाह करणार, म्हणजे तुमचे जेवण दुसऱ्यांनी बनवायचे ! आपल्यासाठी दुसऱ्याला कष्ट का द्यायचे ? असा संन्यास नको. वृत्तीचा संन्यास हवा. कर्मफलाचा संन्यास (त्याग) जो करतो तोच खरा त्यागी तोच खरा संन्यासी.

'गीतेला' सांख्यांचा निष्क्रियपणा नको ज्ञान हवे. तसेच कर्मयोग्यांची आसक्ती नको क्रियाशीलता हवी. सांख्यांनी निष्क्रियता टाकावी, क्रियाशीलता घ्यावी. कर्मयोग्यांनी आसक्ती टाकावी, ज्ञान घ्यावे. भगवंतानी असा ज्ञानकर्म समन्वय साधला. कर्तृत्व व भोक्तृत्व यांचा त्याग करणारा 'कर्मयोग' जगाला सांगितला. ज्ञानाविना कर्म आंधळं तर कर्माविना ज्ञान पांगळ आहे असे 'गीतारहस्या' त लो. टिळकांनी म्हणून ठेवले आहे.

अर्जुना, काही गोष्टी नीट समजून घे -

१) कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे. फळावर नाही.

२) म्हणून फलाचा हेतू ठेऊन कर्म करू नकोस.

३) कर्मे न करण्याचा आग्रहही धरू नकोस.

४) फलत्यागी हाच खरा संन्यासी हाच त्यागी.

५) संन्यास (त्याग) करायचा तो कर्मांचा नाही. तर आसक्तीचा, अहंकाराचा.

अहंकाराचा, कर्मफलाचा त्याग करून यशापयशाबद्दल समबुद्धी ठेवून योगयुक्त होत्साता कर्मे कर. अशा समबुद्धीलाच योग म्हणतात. हाच सात्त्विक त्याग व हाच ज्ञानपूर्ण संन्यास.

☆ काम्य कर्मांचा पूर्णपणे त्याग करावा. (मनात हेतु धरून केलेली कर्मे) चुकूनही ती घडली तर त्याचा फळे इच्छा असो वा नसो भोगावीच लागतात. म्हणून मुमुक्षूने ही काम्य कर्मे चुकूनही करू नयेत. त्यांचा संन्यास करावा.

☆ नित्य नैमित्तिक कर्मे (स्वभावजन्य) अवश्य केलीच पाहिजेत पण त्याचे फळ मात्र घेऊ नये.

निषिद्ध काम्य कर्मांचा त्याग व नित्य नैमित्तिक कर्मांच्या फलाचा त्याग केला तर मनुष्याचे दोष जाऊन तो आत्मज्ञानाचा अधिकारी होतो.

व्यक्तिगत मोक्ष विचार हा स्वार्थीपणाचा आहे. लो. टिळकांनी कर्मयोगाचा पुरस्कार करून निरपेक्ष भावनेनं देशसेवेसाठी पुढे येण्याचे तरुणांना आवाहन केले. लोकांना आदर्श म्हणून ज्ञानोत्तर कर्मे आवश्यक आहेत. असे गीतेनेच सांगितले आहे. विवेकानंदानीही रामकृष्ण मिशनची स्थापना करून ज्ञानोत्तर कर्मांचा आदेश देऊन समाजसेवेची बांधिलकी सर्व संन्याश्यांना बंधनकारक केली.

अलिप्तता, अनासक्ती, निष्कामता, इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह हेच संन्याश्याचे खरे स्वरूप आहे. कर्मशीलतेतही ते आवश्यक आहे. 'संन्यास' या शब्दाने मला फलत्याग अपेक्षित आहे. कर्मत्याग नव्हे. आपल्या भारतीय संस्कृतीचं प्रतिक असलेलं 'कमल' हे अलिप्ततेचं सुंदर उदाहरण आहे. सर्व मंदिरात देवापुढे नित्य असणारं 'कासव' हे संयमाचं प्रतीक आहे.

कर्म केले की फळ भोगावे लागते व मग 'कर्म' व 'कर्मफल' असे चक्र सुरु राहते. (बीजातून झाड झाडातून बीज) ही येरझार आम्हाला नको आहे म्हणून आम्ही कर्मत्यागच पत्करतो. असे सांख्याचे म्हणणे. भगवंत म्हणतात कर्मांची फळे त्रिविध असतात. इष्ट, अनिष्ट व मिश्र. १) इष्ट फल-देवयोनीत जन्म २) अनिष्ट फळ - पशु, पक्षी झाड वनस्पती जन्म ३) मिश्र फळ - मनुष्य जन्म. प्रत्येक कर्मांचे कोणतेतरी फळ मिळणारच ही तत्वचिंतकाची कल्पना. परंतु तसे नसते. 'बी' भाजले की ते उगवत नाही. कर्तृत्व मद व फलासक्ती गेली की ती कर्मे भाजलेली बीजे होतात. ती तिथेच संपतात. त्याला पुन्हा फळ भोगण्यासाठी जन्म नाही. मी यालाच संन्यास म्हणतो. अशा संन्याश्याला त्रिविध कर्म फले प्राप्त होत नाहीत. तो पापपुण्याच्या पलिकडे गेलेला असतो. कर्मांची पाच कारणे आहेत. १) शरीर २) जीवात्मा (अहंकार) ३) इंद्रिये (साधने) ४) वायूशक्ती ५) दैव. ही पाच कारणे मिळून प्रकृती. ही प्रकृती कार्य करते. आंब्याच्या झाडाच्या बीजातून आंब्याचे झाड उगवते. संत्र्याच्या बीजातून संत्र्याचे झाड प्रकृतीनुसार उगवते. त्याचा कर्ता मी आहे, असे सूर्य म्हणत नाही. त्याच्या नुसत्या उपस्थितीने सर्व कार्य होते.

ज्याला कर्तृत्वाचा अहंकार नाही. फळाची आसक्ती नाही. त्याने जगाचा संहार केला तरी कर्मबंधन त्याला पडत नाही. कर्मांच्या कर्तृत्वाची जाणीव व हेतू नसेल तर त्याला पाप लागत नाही. कर्मांचा कर्ता त्याला म्हणता येत नाही. म्हणून मी कसा लढू ? मी आप्तस्वकीयांना कसा मारू ? मला पाप लागेल. हा 'मी' चा अहंकार मनातून काढून टाक. तू क्षत्रिय आहेस, राजा आहेस म्हणून तू व्यक्तिगत विचार न करता समष्टीसाठी कर्तव्य कर्म कर. म्हणजे त्याचा कर्ता तू नाही. तुला पाप लागणार नाही. म्हणून तू निष्काम व निरहंकारी हो.

कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम ।
इति ते संशयो माभूत राजा कालस्य कारणम् ॥

श्रीकृष्णाने आधी केले मग सांगितले. स्वत: जे सांगितले ते करून जगून दाखवले. म्हणून तो महान नेता-द्रष्टा बनला. त्याचे दर्शन म्हणजेच गीता. (श्रीकृष्णाने कंस (मामा), शिशुपाल (आतेभाऊ) यांचा वध केला.)

कपिल मुनींचे संख्या (गुण) शास्त्र सांगते. ज्ञान-कर्ता-कर्म यांच्या बरोबर बुद्धी, धृती, सुख यांचेही त्रिगुणात्मक वर्णन आहे. कारण १) तमोगुण (प्रमादकारी, मूर्खपणा करणारा २) रजोगुण (क्रोधात्मक आसक्ती वाढवणारा) ही गुणकर्मे टाकायची. ३) सत्वगुण (निर्मल, प्रकाशक, ज्ञानमय, निर्दोष) हे स्वीकारायचे. आता आपण तामस, राजस, सात्विक या त्रिगुणांपैकी प्रत्येकाचे जीवन ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धी, धृती व सुख या दृष्टीने कसे आहे ते पाहू -

**अ) तमोगुणी जीवन -**

१) तामस ज्ञान - तत्त्वशून्य, क्षुद्र, अल्पज्ञान, चाकोरीबद्ध जीवन.

२) तामस कर्म - मोहाने कुवत न ओळखता केलेले परिणामाचा विचार न करता केलेले.

३) तामस कर्ता - चंचल, आळशी, अज्ञानी, हट्टी, उदास, कपटी.

४) तामस बुद्धी - अज्ञानी मंदबुद्धी, तामसी बुद्धी, अधर्माला धर्म मानणारी.

५) तामस धृती - अविवेकी बुद्धी, निद्रा, भय, विषाद, शोक, मद यांना न सोडणारी, निराश, वैतागलेली, कामाचा कंटाळा, काही न करणे ही सुखाची कल्पना, न्यूनगंडग्रस्त.

**ब) रजोगुणी जीवन -**

१) राजस ज्ञान - सर्व भूतांचे भिन्न भिन्न भाव, विविधता वेगवेगळे गुणधर्म व उपयोगिता सांगणारे ज्ञान. प्राण्यांच्या, वनस्पतींच्या मिश्रणातून नवनवीन संकर जाती निर्माण तंत्र अवगत. मानवी जीवनाला राजस गुणांनी व्यापले आहे. त्यातून राजस गुणांचेच दर्शन होते. स्वार्थासाठी त्याने ज्ञानाचा विस्तार केला. शोध लावून साधन, सुविधा घडवल्या. उदा. लोखंड, पोलाद, प्लॅस्टिक, यंत्रे, पत्रे, घड्याळे, टी.व्ही., फ्रीझ, गीझर, कॉम्प्युटर वगैरे.

२) राजस कर्म - अर्थ, काम या दोन पुरुषार्थांची अनंत कर्मे, अहंकार पूर्ण कामना धडपडीने विकास कर्मे

३) राजस कर्ता - फलासक्त, लोभी, हिंसक, अपवित्र, सारे जग जणू आपल्या उपभोगासाठी आहे असे समजणारा, व्यसनी छंदी फंदी, स्त्रीलंपट, लाभ हानी यावर हर्ष शोक, भ्रष्टाचारी, हेतूपूर्ण कर्मे.

४) राजस बुद्धी - धर्म, अधर्म, कार्य अकार्य न जाणणारी स्वकेंद्री वृत्ती, फायदा व सुखदायक कार्य करणे, तोटा व दुःख दायक काम न करणे.

५) राजस धृती - अहंभाव तीव्र, काम हाच पुरुषार्थ. (काम-अर्थ-धर्म हा क्रम) काम व अर्थ पूर्तीसाठी धर्म करतात. त्यागाचे फल हवेच.

६) राजस सुख - विषय व इंद्रियांचे सुख हे प्रारंभी सुखदायक नंतर दुःखदायक.

**क)सत्वगुणी जीवन -**

१) सात्त्विक ज्ञान - विविधतेत एकता, सर्वाभूती एकच एक चैतन्य तत्व आहे हे कळणे म्हणजे ज्ञान. सत्वगुणी जीवन हा गीतेचा अध्यात्मिक आदर्श.

२) सात्त्विक कर्म ('नियतं कुरु कर्म त्वम' ही भगवंताची आज्ञाच आहे.) नियत, संगरहित, कामक्रोधरहित, फलाशारहित असे कर्म.

३) सात्त्विक कर्ता - मुक्तसंग, निरहंकारी, धैर्य, उत्साही, फलाशारहित, स्थिरबुद्धी अशा व्यक्तींना भक्तीतून प्रेरणा मिळते. आई मुलासाठी, देशभक्त हा देशासाठी, कलाकार कलेसाठी कष्ट घेतो ते केवळ कार्यात आनंद म्हणून.

४) सात्त्विक बुद्धी - प्रवृत्ती - निवृत्ती, कार्य - अकार्य, भय - अभय, बंध-मोक्ष हे उत्तम जाणणारी स्थिरबुद्धी व विवेकनिष्ठ बुद्धी.

५) सात्त्विक धृती - धृती म्हणजे स्थिरभाव. धृतीने योगी इंद्रियांना वश करून घेतो. हे रूपक बघा - योगी - जीवन रथ, आत्मा -रथात बसणारा, बुद्धी-सारथी, मनाचे - लगाम, इंद्रियांचे घोडे, विषयाचा - रस्ता.

६) सात्त्विक सुख - आरंभी दुःखदायक, नंतर आनंद, सुखदायक आवश्यक तेवढेच सुख भोगणे (कमी नाही जास्त नाही) अभ्यासाने हे जमू शकते. संयमाचा आदर्श म्हणून कासवाचे उदाहरण भगवंत देतात.

मनाला आवर घाला. एकाग्र करा. धरण बांधताच जलाशयातून विद्युत निर्माण होते. तसेच मनशक्तीने कुंडलिनी जागृत होते. ती जागृत होताच आनंदाचे डोही आनंदतरंग उठतात. अवर्णनीय प्रत्यय येतो. जर आत्म्याची बुद्धीची प्रसन्नता असेल तर मुखावर तेज येते, वाणीत माधुर्य येते. डोळ्यात शांती समाधान, स्वभावात गांभीर्य, समतोल येतो. त्याच्या असल्याने वातावरण सुगंधित, आनंदित, प्रफुल्लित होते.

सारे विश्व त्रिगुणात्मक, त्रिगुणरहित असा माणूस प्राणी वा देव कोणीही नाही. विश्वरचना द्वंद्वात्मक असून ती त्रिगुणात्मक आहे. या रचनेतूनच चार वर्ण निर्माण झाले व चतुर्विध पुरुषार्थ. गीतेच्या चौथ्या अध्यायात भगवंतानेच म्हटले आहे -

*चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।*
*तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ ४.१३*

ही चार वर्णांची समाजरचना मनुष्यांचे स्वभावधर्म आणि तद्नुरुप त्यांची कर्मे ह्यांना अनुसरून मी निर्माण केली आहे. मी तिचा कर्ता असूनही अकर्ता व अविनाशी आहे हे जाणून घे. कर्मफलाची मला इच्छा नाही म्हणून कर्मे मला बंधनकारक होऊ शकत नाहीत. कर्म करण्यातच मला आनंद आहे. अशा मला जो जाणतो तोही कर्मांनी बद्ध होत नाही.

वर्ण गुणक्रमाने ठरतो. वर्ण म्हणजे जाती नव्हेत. त्रिगुणांच्या मिश्रणाने 'अहंकार' हा वर्ण निर्माण झाला. 'मी'ची जाणीव झाली. प्रकृती-पुरुष या द्वंद्वाच्या कामक्रीडेचा अविष्कार म्हणजे हे विश्व. मनाच्या पातळीवर जगतो तो माणूस, देहाच्या पातळीवर जगतो तो पशू. चार वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र हे 'अहं'चे द्वंद्वात्मक रचनापद्धतीने चार वर्ण पडतात. भगवंत त्याचे 'गुण' (कर्म) सांगत आहेत. हे चार वर्ण त्यांच्या स्वभावजन्य गुणाप्रमाणे विभागलेले आहेत.

१) ब्राह्मण - ज्ञानबल (ज्ञानवंत) शिक्षकीपेशा.

स्वाभाविक गुणधर्म - शम, दम, शुचिता शांती, आत्मज्ञान, ईश्वरनिष्ठा

२) क्षत्रिय - बाहुबल (पराक्रमी) सैनिक पेशा

स्वाभाविक गुणधर्म - शौर्य, धैर्य, तेजस्विता, दक्षता, प्रभुत्व

३) वैश्य - धनबल (व्यवहारी) व्यापारीपेशा स्वाभाविक गुणधर्म - शेती, गुरांचे पालन, व्यापार

४) शूद्र - जनबल (बहुसंख्य) सेवा, शुश्रुषा स्वाभाविक गुणधर्म - सेवा शुश्रुषा

आपापल्या स्वकर्म कुसुमांनी सर्वेश्वराची पूजा करावी. चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून घ्यावेत. (परम सिद्धी व मोक्षप्राप्ती)

✿ प्रत्येकाने आपल्या वर्णानुसार प्राप्त कर्तव्य कर्मे करावीत. त्याने मानवाला सिद्धी प्राप्त होते. पाप लागत नाही.

✿ परधर्म सुखकारक असला तरी स्वधर्मच श्रेयस्कर.

✿ सर्वच कर्मे दोषयुक्त असतात. जसा धुराने अग्नि.

निरीच्छ, निरासक्त, संयमी, निष्काम, निरहंकारी, निर्मोही असा पुरुष ब्रह्मभूत होण्यास (पूर्णत्वाचा आनंद भोगण्यास) समर्थ होतो. पूर्णत्वाचा स्पर्श झाला की तो कोणाचा द्वेष मत्सर करीत नाही. कशाची इच्छा, आकांक्षा धरत नाही. माझ्या स्वरुपाचे ज्ञान त्याला भक्तीने होते. समबुद्धी होऊन तो माझ्या स्वरुपात प्रवेश करतो. मनाने सर्व कर्मे मला अर्पण करून, माझ्या ठायी चित्त ठेवून मत्परायण होऊन कार्यरत राहशील तर तू माझ्या कृपाप्रसादाने सर्व संकटातून तरून जाशील. पण अहंकाराने जर तू मी लढणार नाही म्हणशील तर तुझा निश्चय व्यर्थ

आहे. प्रकृती म्हणजे क्षात्र स्वभाव तुला युद्ध करायलाच लावील. तेव्हा हट्ट सोड. ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात असतो. तो सर्व प्राणिमात्रांना आपल्या शक्तीने फिरवतो. म्हणून तू परमेश्वराला शरण जा. त्याच्या प्रसादाने 'अव्यय पद' प्राप्त करून घेशील.

कर्मयोग हा ज्ञानयोगाचा पाया व ज्ञानयोग हे कर्मयोगाचे शिखर आहे. स्वरुपदर्शन हे विश्वरुपदर्शनाचे उत्तम साधन आहे.

'अर्जुना सारे अत्यंत गुह्य ज्ञान तुला मी सांगितले आता त्याचे नीट मनन करून जसे तुझ्या मनास येईल तसे कर.' भगवंत म्हणाले सर्व गुह्यातील गुह्य असे माझे सर्वोत्कृष्ट वचन पुन: ऐक. तू माझा फार आवडता भक्त आहेस म्हणून तुझ्या हिताची, कल्याणाची गोष्ट सांगतो.

*मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।*
*मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ १८.६५*

माझ्याकडे चित्त ठेव, माझा भक्त हो, माझी उपासना कर, मलाच नमस्कार कर तर मलाच प्राप्त होशील. तू मला अत्यंत प्रिय आहेस हे सत्य तुला मी प्रतिज्ञेवर सांगतो. सर्व धर्म सोडून तू मलाच शरण ये. मी तुला सर्व पातकातून मुक्त करीन. तू आपला शोक सोडून दे. काळजी करू नकोस.

गुह्यतम शास्त्र सांगून झाले. आता गीता शास्त्र संप्रदायाचे पथ्य भगवंत अर्जुनाला सांगतात. तुझ्या हितार्थ सांगितलेले हे गीतारुपी परम रहस्य कधीही तपोहीन मनुष्याला सांगू नये. तसेच भक्तिहीन आणि ऐकण्याची इच्छा नसणारालाही सांगू नये. तसेच माझी निंदा करणाराला सुद्धा सांगू नये.

जो पुरुष माझ्या ठिकाणी परम प्रेम ठेवून हे परम रहस्ययुक्त असे गीता शास्त्र माझ्या भक्तांना सांगेल तो नि:संशय मलाच येऊन मिळेल आणि त्याच्याहून अधिक माझे अत्यंत प्रिय कार्य करणाऱ्या मनुष्यांमध्ये दुसरा कोणीही होणार नाही आणि आमच्या धर्मसंवादाचे जो अध्ययन करील त्याने ज्ञानयज्ञाने माझी उपासना केली असे मी समजेन. तसेच जो दोष न काढता श्रद्धेने हा आमचा संवाद श्रवण करील, तोही पापमुक्त होऊन पुण्यकर्मे करणाऱ्या लोकांना मिळणाऱ्या शुभ लोकाला जाईल.

हे पार्था हे गीताशास्त्र तू एकाग्रतेने ऐकलेस ना ? हे धनंजया, तुझा अज्ञान मोह समुळ नष्ट झाला ना? यावर अर्जुन म्हणाला,

*'नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।*
*स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव ॥ १८.७३*

हे श्रीकृष्णा, तुझ्या कृपाप्रसादाने माझ्या मनातील मोह पार नाहीसा झाला. मला माझ्या कर्तव्याची स्मृती उत्पन्न झाली. मी नि:संदेह होऊन राहिलो आहे, संशयरहित झालो आहे. आता तुझ्या सांगण्याप्रमाणे मी (युद्ध) करीन.

दुसऱ्या अध्यायात अर्जुन म्हणाला होता 'मी तुझा शिष्य आहे, मला श्रेयस सांग.' २.७ भगवंतानी त्याच्या निमित्ताने अवघ्या मानवजातीला श्रेयसाचा (हिताचा, आत्मकल्याणाचा) उपदेश केला. अर्जुन कृतार्थ झाला.

गीताशास्त्र इथे संपले. पुढे संजयाचे हर्षोद्गार आले आहेत. संजयाचा आनंद त्याच्या शब्दातून व्यक्त झाला आहे - हा सारा श्रीकृष्ण व अर्जुनाचा संवाद संजय ऐकत होता. धृतराष्ट्रास सांगतही होता. तो म्हणाला, 'अंगावर रोमाचं उभे करणारा कृष्णार्जुनाचा हा अद्भूत संवाद मी ऐकला. व्यासांच्या कृपेमुळे हे परमगुह्य म्हणजे योगरहस्य साक्षात योगेश्वर श्रीकृष्ण सांगत असताना मलाही ऐकायला मिळाले. हे राजा धृतराष्ट्रा केशव व अर्जुन या दोघांच्या अद्भूत व पुण्यकारक संवादाची आठवण होऊन मला पुन: पुन: हर्ष होत आहे आणि श्रीहरीचे अत्यद्भूत विश्वरूप मनात येऊन हे राजा धृतराष्ट्र, मला मोठा विस्मय वाटतो व पुन्हा आनंद होतो, हर्ष होतो. 'विजय कोणाचा

होईल? तुझे काय मत आहे. या धृतराष्ट्राच्या प्रश्नाला उत्तर म्हणून तो म्हणतो -

*यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।*
*तत्र श्रीविजयो भूतिर्ध्रुवा नीतिमतिर्मम ॥ १८.७८*

जेथे योगेश्वर श्रीकृष्ण व जेथे धनुर्धर पार्थ आहे. तेथेच श्री विजय, शाश्वत ऐश्वर्य आणि नीती असणार असे माझे मत आहे. अर्जुनाच्या प्रमाणे तोही कृतार्थ झाला. पण गीतेपेक्षा युद्धाचा निकाल धृतराष्ट्राला अधिक महत्त्वाचा व प्रिय होता. संजयाची सर्व पापे श्रीकृष्णार्जुन संवादात स्नान करून नष्ट झाली होती. अष्टसात्त्विक भाव दाटले होते. धृतराष्ट्राला उत्तर देताना संजयाने एक चिरंतन सत्य सांगितले आहे. संपूर्ण महाभारताचे आणि गीतेचे सार संजयाने या एका श्लोकात सांगितले आहे.

ज्ञानेश्वरांनी यावर किती सुंदर भाव प्रगट केले आहेत पहा -

*चंद्र तेथे चंद्रिका । शंभु तेथे अंबिका । संत तेथे विवेका असणेच कीं जी ॥*

*रवी तेथे कटक । सौजन्य तेथे सोयरिक । वन्ही तेथे दाहक । सामर्थ्य की ॥*

*दया तेथे धर्मु । धर्मु तेथे सुखागमु । सुखी पुरुषोत्तमु । असे जैसा ॥*

*वसंत तेथे वने । वन तेथ सुमने । सुमनी पालिंगने । सारंगाची ॥*

*गुरु तेथ ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन । दर्शनी समाधान । आधी जैसें ॥*

*तैसें सकळ पुरुषार्थ जेणे स्वामी का सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । तेथ लक्ष्मी ॥*

ज्ञाने. १८. १६३२ ते ३८

गीता म्हणजे भगवान श्रीकृष्णाची वाङ्मयीनमूर्ती. विश्वाची करुणा आल्यामुळे भगवंतानी अर्जुनाच्या निमित्ताने जणु ब्रह्मानंदच सोपा केला. 'गीता निष्कपट माय' म्हणून ज्ञानेश्वरांनाही गीतेचा गौरव केला आहे.

*मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु । १८.६५*
*सर्वधर्मान्परित्यज मामेकं शरणं व्रज ।१८.६६*

या १८ व्या अध्यायातील हे दोन श्लोक हेच गीतेचे गुह्यतम रहस्य व सार आहे.

*'स्वे स्वे कर्म ण्यभिरत: संसिद्धि लभते नर: ॥ १८.४५*
*श्रेयाधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात ॥ १८.४७*

ही दोन अलौकिक तत्त्वे भगवंतानी सांगितली आहेत. कर्माचे अकर्म करणे (नैष्कर्म्य सिद्धी) हा संन्यास आणि सर्वकर्मफलत्याग (अर्थात् कर्तृत्व व भोक्तृत्व या दोन्हीचा त्याग याद्वारेच मोक्षप्राप्त होते हे रहस्य या अठराव्या अध्यायात उलगडून दाखवले असल्यामुळे हा साक्षात मोक्ष संन्यास योग आहे. भगवान श्रीकृष्णांनी दाखवलेल्या मार्गाने जाऊन आत्मोन्नती साधण्यातच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता आहे. तोच खरा पुरुषार्थ व तोच खरा धर्म आहे.

'गीतेच्या पानापानावर नि:स्वार्थी सेवेचा आदेश लिहिलेला आहे. विज्ञानाने जगाला भौतिक एकता (बिनतारी संदेशाने जवळ आणले) प्रदान केली आहे. शरीराने एक केले आहे. मनाने एक करण्याचे काम ज्ञानाचे आहे. गीता जगाला मनाची, बुद्धीची, आत्म्याची एकता प्रदान करते. हे कार्य धर्माचे आहे. ते कार्य गीता करते. श्रीकृष्णाचे हे तत्त्वज्ञान जगाला समजून सांगण्याची शपथ घ्या. तीच त्याची खरी भक्ती.' असे श्रीकृष्ण जीवन दर्शनमध्ये परमपूज्य श्री पांडुरंगशास्त्री आठवले यांनी म्हटले आहे. तशी शपथ आपण गीतेची सांगता करतांना घेऊया.

येशूने ख्रिस्ती लोकांसाठी 'बायबल' ठेऊन त्यांचा

उद्धार केला. मुस्लिमांचीही संकुचित वृत्ती. त्यांनी 'कुराण' ठेऊन मुस्लिमांचा उद्धार केला. मुसलमान तेवढे पाक बाकीचे नापाक ! पण गीता सांगून भगवंताने अखिल मानवजातीचा उद्धार केला. 'स्त्रिया, वैश्या तथा शूद्रास्तेपि यान्ति परांगतिम् । स्त्रिया, वैश्य व शुद्रानाही तो अधिकार दिला. संन्यास - योग - भक्ती या तिन्हींचा संगम हीच या ग्रंथाची अपूर्वता. 'To be or not to be' हे करु की ते करु? हा प्रश्न पडेल तेव्हा गीता हातात धरा. श्रीकृष्ण सांगतो. 'जे व्हायचे असेल ते भले होवो तू तुझे काम (कर्म) श्रद्धापूर्वक, शास्त्रप्रामाण्याप्रमाणे कर. जे करशील ते ईश्वराला अर्पण कर.' श्रीकृष्णाने जे सांगितले ते करून दाखवले, जगून दाखवले. म्हणून तो महान द्रष्टा बनला. त्याचे दर्शन म्हणजेच गीता. केवळ श्रद्धा व भक्तीवर धर्म टिकून राहू शकत नाही. त्यावरोवर बुद्धी पण पाहिजे. (श्रद्धा + भक्ती + बुद्धी) गीता आपल्याला हेच शिकवते. म्हणून काळाच्या झंझावातातही ती टिकून आहे. विज्ञानाचा शोध घेणाऱ्याला ती ऋषी मानते आणि म्हणूनच गीता गाणारा जगद्गुरु आहे, जगाचा उद्धारक आहे. श्रीकृष्णासारखा मानवतावादी शोधून सापडणार नाही.

*'वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।*
*देवकिपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥'*

कंसचाणूरादि दुष्टाचे मर्दन करणारा, देवकी मातेला परमआनंद देणारा, जगाचा गुरु, असा वसुदेवाचा पुत्र, जगाचा स्वामी, परमात्मा श्रीकृष्ण त्याला माझा नमस्कार असो.

कायदा मानवतेचे रक्षण करू शकत नाही. धर्म मानवतेचे रक्षण करू शकतो. परार्थाच्या नावावर अधिक स्वार्थ साधला जातो. स्वार्थाच्या पोटात लपलेली पशुता दूर होईल व उच्च नैतिकता प्रगटेल तेव्हाच मानवता निर्माण होईल. श्रीकृष्णाने प्रथम पशुतेचा नाश करण्याचा पुरस्कार केला. प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले म्हणतात 'पशुता जावी अशी इच्छा असेल तर सत्वर उठा, कामाला लागा, स्वाध्याय करा व जीवनाला तेजस्वी बनवा.'

पशुत्वातून मानव्य व मानव्यातून देवत्व निर्माण करण्यासाठी आत्मिक शक्ती पाहिजे. तेच कार्य गीता करते. विज्ञान प्लुटोनियम धातुतील संहारक तत्त्वाचे (अणुबॉम्ब) शमन करील पण माणसाच्या मनातील सैतानाला काढून टाकणे विज्ञानाला अशक्य आहे. ते कार्य अध्यात्मच करु शकेल.

Science without religion is lame.
Religion without science is blind.

'विज्ञानाशिवाय धर्म पांगळा ठरेल आणि अध्यात्माशिवाय विज्ञान आंधळं बनेल.'

- आधुनिक विज्ञानमहर्षी आइनस्टाईन.

कर्मयोग हा ज्ञानयोगाचा पाया तर ज्ञानयोग हे कर्मयोगाचे शिखर आहे. गीतेच्या उपदेशानुसार जीवन व्यवहार करून त्यानुसार वागून जगाला गीतेची महानता समजावून द्या. मानवतेला अध:पतनापासून वाचवण्याचे सामर्थ्य केवळ गीतेत आहे. जीवनाच्या सर्व अंगास गीतेचा स्पर्श व्हावा कारण 'भगवत गीता' हे जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. गीतेचे तत्त्वज्ञान परमसत्यावर अधिष्ठित व नवे अर्थ पचवण्याची क्षमता राखणारे तत्त्वज्ञान आहे. कर्तृत्वाचा मद व फलासक्ती दोन्ही टाकण्याचे मार्ग निष्काम कर्मयोग.

'स्वे स्वे कर्मण्याभरत: संसिद्धिं लभते नर: । १८.४५

आपआपल्या स्वभावजन्य गुणांप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्माच्या ठिकाणी नित्य रत असलेल्या नराला चांगली सिद्धी प्राप्त होते. हा गीतेचा अवघ्या मानवजातीला अलौकिक संदेश आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' कर्म करतानाच अकर्ता व अभोक्ता कसे व्हावे हे गीता आपल्याला शिकवते.

गीतेच्या कर्मयोगाची थोरवी अशी की त्यासाठी संन्यासाची आवश्यकता नाही. कर्माच्या ठिकाणी जो अकर्म

पाहतो व अकर्माच्या ठिकाणी जो कर्म पाहतो तोच खरा निष्काम कर्मयोगी. हीच नैष्कर्म्य सिद्धी. गीतेत सांगितलेला संन्यास कर्माचा नाही. कर्मफलाचा, अहंकारी वृत्तीचा आहे. निष्काम कर्मात कर्तृत्वाचा व भोक्तृत्वाचा दोन्हींचा संन्यास (त्याग) असल्यामुळे निष्काम कर्मयोग हा तत्त्वत: संन्यासच आहे. संन्यास म्हणजे वृत्तीची निवृत्ती.

अति प्रवृत्ती - अध: पतन } प्रवृत्ती + निवृत्ती (समन्वय)
अति निवृत्ती - अध: पतन } उत्कर्ष विकास

आपले जीवन प्रकृती पुरुषाचे मीलन. भगवंताने प्रकृतीचा अंगिकार केला म्हणून तो सौम्य झाला. आपले जीवन परमात्म्याचे सौम्य दर्शन. परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन म्हणजे चैतन्याचा प्रलय. म्हणजेच विश्वाचा विलय. परमात्म्याची समग्रता जीवनात न मावणारी. जीवनाचे, प्रकृतीचे अस्तित्व संपवणारे विराट विश्वरुपदर्शन हे सत् असले तरी भयभीत करणारेच. म्हणून अर्जुनानेही पुनश्च हरिरुपाचा आग्रह धरला.

विश्वरूपावर ध्यान केंद्रित कर म्हणजे सगुणातून निर्गुणाचे ध्यान कर. साकारातून निराकाराचे, सान्तातून अनंताचे ध्यान कर. ज्ञानाला जे शक्य नाही ते भक्तीला शक्य आहे. निराकार चैतन्य हे जीवनाचे श्रेष्ठ जीवन मूल्य आणि भक्ती-सगुणावर प्रेम करणारी हीही श्रेष्ठ. ईश्वराशी नित्य अनुसंधान हे गीतेचे ज्ञान-ध्यान व प्रार्थना.

गीतेचे सार अनेक विद्वानांनी सांगितलेले आहे.

- अनासक्त कर्मयोग - महात्मा गांधी
- कर्मयोग - लो. टिळक
- साक्षात्कार योग - गुरुदेव रानडे
- स्मरण योग - सद्गुरु वामनराव पै
- माम अनुस्मर युद्धच - भगवान श्रीकृष्ण.

अर्जुनाने रणांगणातून पळून जाऊ नये म्हणून हा भगवंताचा गीता प्रपंच. 'माम अनुस्मर युद्धच' व 'योग: कर्मसु कौशलम्' हे फक्त अर्जुनाला नाही तर सर्व मानवजातीला सांगितले आहे. 'मी अर्जुन नसून खरा मी ईश्वर स्वरुप आहे. या स्मरणातून युद्ध कर. म्हणजे केलेल्या कर्माची फळे भगवंताकडे जातील. सामान्य माणूस जगतो ते जीवनही एक प्रकारचे युद्धच असते. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।' - तुकाराम महाराजांनी हे म्हणूनच ठेवलेले आहे.

*मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे तू कष्टी होसी ।*
*रामकर्ता म्हणता पावसी । यश, कीर्ती, प्रताप ॥*

- रामदास

'कर्ता करविता तोच व फळही त्याचेच' या भावनेने केलेले कर्म म्हणजे कर्मयोग. कर्ताही ईश्वर भोक्ताही तोच ईश्वर. स्मरणयोगात मी कोणीच नसून केवळ ईश्वरच आहे अशी दिव्यस्मृती प्राप्त होते.' - जीवन विद्येचा कलश

- सद्गुरु वामनराव पै

गीतेसारखा अपूर्व तत्वज्ञानाचा ग्रंथ विश्वात दुसरा नाही. कोणत्याही कर्माला निष्कामतेचा व शुद्ध भक्तीचा स्पर्श झाला की त्या कर्माचा योग होतो. आपले स्वकर्म स्वधर्मात पालटते. चित्ताचे समत्त्व हेच योगाचे रहस्य. गीतेने प्रतिपादलेला मोक्षप्राप्तीचा मार्ग सर्व वर्णांच्या व सर्व जातीच्या आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना सारखाच मोकळा व आचरता येण्याजोगा आहे. म्हणून देशसेवा, लोकसेवा करण्यास प्रवृत्त करणारा आहे. म्हणून प्रत्येकाने या दिव्य ग्रंथाचे पठन, मनन, चिंतन करून तसे आचरण करण्याचा प्रयत्न करावा. गीतेतील योग मार्गाने जो आयुष्यक्रमण करील तर त्याचे, त्याच्या समाजाचे व त्याच्या देशाचे, जगाचे, ऐहिक व पारलौकिक अशा दोन्ही दृष्टींनी कल्याणच होईल.

दुर्गा भागवत यांच्या 'व्यासपर्व' ग्रंथातील 'संपूर्ण महाभारता'तील 'गीतापर्व' मधील आपण साऱ्या अर्जुनांना सुयोग्य संदेश देणारा हा उतारा देऊन अठराव्या अध्यायाची

समाप्ती करते.

अर्जुना ! गुरुदक्षिणा, गृहलक्ष्मी, मान, न्याय, कर्तव्य, प्रतिज्ञा, वैभव, धनसंपदा हे सारे मनुष्याच्या अस्मितेचे पैलू आहेत. त्यासाठी 'मी'पणा पणाला लावून माणूस जिद्दीनं उभा राहतो आणि तो तसा उभा राहिला पाहिजे. तरच तो खरा माणूस !

कर्तव्य कर्म करून परिपूर्ण, समाधानी झाल्यानंतर अनेक ऐहिक सुखं सन्मानानं भोगल्यावर, अन्यायाचा नाश करून, न्यायाला पृथ्वीच्या सिंहासनावर बसवल्यावर, मानानं जिणे जगल्यावर, अपमानाचा बदला घेऊन स्वत:चं सामर्थ्य सिद्ध करून खरी समृद्ध आणि सशक्त शांतता स्थापल्यावर मग - अर्जुना ! मगच घेतलेला संन्यास म्हणजे खरी निरीच्छ आणि पारमार्थिक मुक्त निवृत्ती होते. कर्तव्य कर्म मोहमायेनं, वेड्या समजुतीने लाथाडून नव्हे.

दारिद्र्यातलं समाधानं खोटं आहे. ते क्रियाशून्यतेचं आहे, कर्तव्य हीनतेचं आहे, पराक्रम हीनतेचं आहे. तेव्हा उठ ! कर्तव्याचं धनुष्य उचल, अमानुषतेला, दुष्टपणाला कर्मशीलतेचे बाण मारून नष्ट कर आणि न्याय, धनश्री प्राप्त करण्यासाठी धनुष्याला प्रत्यंचा जोडून कर्तव्यकर्माचा बाण समोर शत्रू म्हणून उभ्या असलेल्या अधर्मावर सोड, युद्धाला प्रारंभ कर -

'संपूर्ण महाभारतातील गीतापर्व'

- व्यासपर्व (मधून) दुर्गा भागवत

'योग: कर्मसु कौशलम् कार्य कर्म समाचार त्यागात शांतिरनन्तरम् ।

उद्धरेत आत्मनात्मानम् सत्वात संजायते ज्ञानम्' असा आदेश देऊन गीतेने 'जीवनोपनिषद गीता' असे बिरुद प्राप्त करून घेतले आहे.

'<u>इतर देशात भगवंताचे प्रेषित येतात. आपण भाग्यवान म्हणून आपल्या देशात भगवंतच अवतरतात.</u> संपूर्ण पृथ्वी हे जर एक मोठे घर मानले तर बाकीचे देश घरातील मोठी दालने असतील पण भारतवर्ष म्हणजे 'देवघर' आहे.' त्याचे पावित्र्य आपणच राखायचे आहे. 'गीतासागर' ग्रंथातील विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी भारतवर्षाला दिलेले स्थान यथार्थ आहे. जो देश प्रत्यक्ष देवांनी निर्माण केलेला आहे अशा श्रेष्ठ देशात 'भगवद्गीता' जन्मली. आपला देश महान व आपण भाग्यवान.

हरि: ॐ तत्सत् हरि ॐ तत्सत् हरि: ॐ तत्सत्

**आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंटस्, 'आराधना' टॉकीजजवळ,

ठाणे (प.) - ४०० ६०२. फोन : २५४१०१४०

## टीप

*'जाले साधनाचें फळ । संसार जाला सफळ । निर्गुण ब्रह्म ते निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ -दासबोध दशक १०.२६*

*रामदास स्वामींनी दासबोधाच्या समासीला असे म्हटले आहे. त्याप्रमाणेच आज गीतेच्या १८ व्या कळसापर्यंत आपण भगवंताच्या कृपेने पोचलो आहोत. आपल्यासारख्या रसिक वाचकांच्या उदंड प्रतिसादामुळेच ही लेखमाला आज पूर्ण होत आहे. श्रोते काय किंवा वाचक काय ही भगवंताचीच रुपं ज्ञानेश्वरांप्रमाणेच त्यांना त्रिवार वंदन करून आपला निरोप घेते. 'तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते । करुनि घ्यावे ते तुमते । विनवितु असे ॥ ही ज्ञानेश्वरांच्याच शब्दात विनंती.*

# परिसर वार्ता

### नॅकची व्हिजिट - धावता वृत्तांत

विज्ञान महाविद्यालयातले आम्ही सर्व गेले वर्षभर नॅकच्या तयारीत होतो. परीक्षा आली की अभ्यासाचा डोंगर दिसायला लागतो, वेळ पुरत नाही, रात्र थोडी विषय फार असं वाटायला लागतं तसं आमच्या महाविद्यालयात गेल्या महिन्यात वातावरण होतं. काही झालं की चंदुभाईंना शोध, दुर्गाण्णांना शोध, अमूक राहिलंय, तमूक राहिलंय. पाहुणे घरी येणार असतील तर घरातील अबाल वृद्धांची धावपळ उडत असते. आम्हा बांदोडकर कुटुंबियांचीही तीच अवस्था होती. मिटिंग चालल्या होत्या, पोद्दार सर, पाटील सर, पेजावर मॅडम, मेढेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व गतीने होता होता कॉलेजचं रूप पालटलं. ग्रंथालयातील कित्येक वर्षे रंगाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या कपाटांना श्री. राऊत व श्री. आरेकर यांच्या पुढाकारामुळे रंग लागला. माझे ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी श्री. संदीप कांबळे, सौ. सुधा पाटील यांनीही प्रचंड मदत केली. माजी विद्यार्थ्यांचे फोन सारखे वाजत होते आणि २७/२८ ऑगस्ट रोजी नॅकची पीअर टीम आली.

कोचीन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उन्नीकृष्णन नायर यांच्या नेतृत्वातील या टीममध्ये अत्यंत विद्वान व कुशल वक्ते म्हणनू प्रसिद्ध असणारे फोंडा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अरुण हेबळेकर व डॉ. अझीझ अहमद व डॉ. रमा मॅडम यांचा समावेश होता. निरोप समारंभात हेबळेकर सरांनी केलेले व्याख्यान अप्रतिम होते. डॉ. उन्नीकृष्णन व अहमदसरांनी ही संस्थेच्या प्रयत्नाबद्दल प्रशंसोद्गार काढले व महाविद्यालयास अतिशय उज्ज्वल भविष्य असल्याबद्दल विश्वास व्यक्त केला.

आदल्या दिवशी आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक व माजी विद्यार्थी श्री. शैलेश भागवत यांच्या शहनाई वादनाचा कार्यक्रम खास पाहुण्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. श्री. भागवत भारतरत्न बिस्मिल्ला खाँ साहेबांचे एकमेव शागीर्द. त्यांच्या सनईने संपूर्ण थोरले बाजीराव पेशवे सभागृह भारावून गेले. अहमद सरांनी तर त्यांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष कौतुक केले.

पीअर टीम व्हिजीटच्या दुसऱ्या दिवशी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पाहुण्यांसाठी भरविण्यात आलेले प्रदर्शन महाविद्यालयाच्या इतिहास झाले नसेल इतके देखणे व महाविद्यालयाच्या सर्व विभागांची (एन.सी.सी. एन.एस.एस. सह) व इतिहासाची कल्पना देणारे असे हे प्रदर्शन होते. प्रदर्शनाचे मुख्य शिल्पकार व मार्गदर्शक आमच्या जीवशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. आर.पी.आठल्ये होते. त्यांना विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मदत करून उभारण्यात आलेले हे प्रदर्शन पाहून पाहुण्यांनी खास दाद दिली.

या नॅक शिबिरासाठी महाविद्यालयाचे विद्यमान विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक आणि असंख्य संबंधित घटकांची जी मदत झाली ती खास नोंद घ्यावी अशी आहे. वास्तविक या व्हिजीट संदर्भात 'दिशा'चा एक विशेषांक काढता येईल, इतके अनुभव आम्ही सर्वांनी घेतले. प्राचार्य पाटील सर व उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांचे मोलाचे मार्गदर्शन ही या सर्व अनुभवांमागील प्रेरणा होती.

### पदार्थ विज्ञान व विज्ञान मंडळाचे संयुक्त उद्घाटन

वा. ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या पदार्थ विज्ञान मंडळ व विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३/७/२००३ बुधवार रोजी महाविद्यालयाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात 'कणाद ते कलाम' हा कार्यक्रम

आयोजित करण्यात आला.

सुप्रसिद्ध आकाश निरीक्षक श्री दा.कृ. सोमण व सोमाणी महाविद्यालयाचे माजी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. मोहन आपटे यांनी सादर केलेला हा कार्यक्रम श्रोत्यांच्या ज्ञानात फार मोलाची भर घालून गेला.




*पाहुण्यांचे स्वागत करताना प्राचार्य सी. जी. पाटील*

सर्वप्रथम प्रा. प्रभाकर भट यांनी प्रास्ताविक भाषण केले. प्राचार्य सी. जी. पाटील व उपप्राचार्या डॉ. पेजावर यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. नामदेव मांडगे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

श्री. दा.कृ. सोमण व प्रा. मोहन आपटे यांनी हा कार्यक्रम अभिनव पद्धतीने सादर केला. एकमेकांशी व प्रेक्षकांशी गप्पा असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. आपल्या दीड तासांच्या कार्यक्रमात त्यांनी इ.स. पूर्व ५०० वर्ष ते ईसवीसन २००३ पर्यंतच्या कालखंडात आपल्या देशात होऊन गेलेल्या वैज्ञानिकांची माहिती व त्यांनी केलेले संशोधन यांचा गोषवारा दिला.

सर्वप्रथम कणाद (इसवी सन पूर्व ५०० वर्षे) यांच्या वैशेषिक दर्शन व त्याच्या अणू (atom) व द्विअणु (molecule) यांच्या संकल्पनांची चर्चा केली व त्याचा समकालीन गौतम ऋषी याच्या न्यायशास्त्राचा आढावा घेतला. पाणिनींच्या व्याकरणाची व contest free language ज्याचा आधुनिक संगणकाशी जवळचा संबंध आहे याची माहिती सांगितली. त्यानंतर चरक सुश्रुत यांच्या आरोग्य विज्ञान संबंधीच्या अथांग ज्ञानाची जाणीव श्रोत्यांना करून दिली. प्लास्टिक सर्जरी या संकल्पनेचा आद्य जनक हा चरक होता हे ऐकून श्रोते थक्क झाले. तद्नंतर इसपूर्व २००-१५० वर्षे या कालखंडात होऊन गेलेल्या पातंजल यांच्या योगशास्त्र व कपिल मुनींच्या सांख्यशास्त्राची माहिती सांगितली. त्यांनी केलेला हा उल्लेख गीतेच्या पाचव्या अध्यायातील पाचव्या श्लोकाची आठवण करून गेला.

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥

(अर्थात, जे स्थान सांख्यांना मिळते तेच योग्यांनाही मिळते. सांख्य आणि योग ही दोन्ही एक असे जो जाणतो, तोच उत्तम प्रकारे जाणतो.)

सध्या शास्त्र ज्या Theory of Everything या संकल्पनेचा विचार करीत आहेत त्याचा व सांख्य व योग शास्त्र याचा संबंध श्रोत्यांच्या निदर्शनास आणून दिला. उपनिषद, गीता व ब्रह्मसूत्र या प्रस्थान त्रयीची चर्चा केली. त्याचबरोबर कौटिल्याच्या अर्थशास्त्राविषयक ज्ञानाची (ज्यात macroeconomics व micro-economics दोहोंचा अंतर्भाव होता) माहिती सांगितली.

गुप्तकाळ (इ. स. ३१५ ते इ.स. ५२५) ज्याला सुवर्णयुग म्हणता येईल. ह्या काळात आपला देश सर्वोच्च अवस्थेत होता. त्या काळात वराहमिहीर आर्यभट्ट या श्रेष्ठ गणितज्ज्ञांची माहिती तसेच $\pi$ ह्या constant ची चार दशांशापर्यंची किंमत त्या काळातील ह्या गणितज्ज्ञांना माहीत होती हे ऐकून श्रोते स्तिमित झाले.

दिल्ली येथील लोह स्तंभ जो आज शेकडो वर्षे न गंजता राहिला आहे यावरून त्या काळात धातुशास्त्र (metallurgy) किती प्रगत होते ह्याची कल्पना श्रोत्यांना आली.

दशमान पद्धत ही Theory of Countingला भारतीयांकडून मिळालेली भेट आहे व त्याला भास्कराचार्यासारखे गणिती जबाबदार आहेत. केवळ विज्ञानच नव्हे तर कला, संगीत, नाट्य या सर्वच आघाड्यांवर भारत हा मानवजातीचा पथदर्शक होता हे ऐकून श्रोत्यांनी टाळ्यांचा गजर केला.




*(डावीकडून) प्रा. मोहन आपटे व श्री. दा. कृ. सोमण*

नंतर होऊन गेलेल्या शास्त्रज्ञात गणेश दैवज्ञ याचा ग्रहलाघव हा ग्रंथ, सवाईजयसिंगाने ग्रह गोलांच्या गती समजून घेण्यासाठी उभारलेले जंतरमंतर, जगदीशचंद्र बोस (Bose-Einstein Statistics), खुराना रामानुजम सारख्या थोर शास्त्रज्ञांच्या कार्यांचा आढावा घेतला. चंद्रशेखर यांच्या चंद्रशेखरस लिमीट ह्या ताऱ्यांच्या निर्मितीचा सिद्धांत, राष्ट्रपती श्री. अब्दुल कलाम यांच्या क्षेपणास्त्र निर्मिती विषयक अथक परिश्रमांची माहिती त्यांनी प्रेक्षकांना सांगितली.

एकंदरीत कणाद ते कलाम हा अडीच हजार वर्षांचा प्रवास श्री. सोमण व प्रा. आपटे या द्वयींनी दीड तासात घडविला.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वात शेवटी प्रा. बापट यांनी आभार प्रदर्शन केले व या कार्यक्रमाची सांगता झाली.

### बांदोडकर गणित मंडळ

'मोजता येणार नाही अशी संख्या असूच शकत नाही. संख्या मोजण्यात प्राचीन भारतीयांनी जगाला दिलेली शून्याची देणगी महत्त्वाची आहे', असे उद्‌गार आय्. आय्. टी. चे गणितज्ज्ञ डॉ. इंदर राणा यांनी दि. २१ जुलै रोजी महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बोलताना काढले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या गणित मंडळाच्या या शैक्षणिक वर्षातील उपक्रमांचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते, 'लेट अस काऊंट 1, 2, 3..... इनफिनिटी' या विषयावर माहितीपूर्ण विवेचन करताना नैसर्गिक आकडे व चिन्हे यांची उत्क्रांती व पीजन होल तत्व यांचे महत्व विशद केले.

गणित मंडळाचे विद्यार्थी प्रतिनिधी नासिर यांनी व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील होते. त्यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. राणा यांचे स्वागत केले तर विद्यार्थी प्रतिनिधींनी प्राचार्य सी. जी. पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित, गणित विभागाचे प्रमुख ज्येष्ठ प्रा. आर्. एस्. पोद्दार यांचे स्वागत केले. डॉ. राणा यांचा परिचय प्रा. पोद्दार सरांनी करून दिला. डॉ. राणा यांनी पॉवर पॉइंटच्या आधारे आपले व्याख्यान सादर केले. कार्यक्रमास गणित विभागातील प्राध्यापक, इतर विषयांचे प्राध्यापक याचबरोबर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप नासिर यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाला.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'अनुबंध' माजी विद्यार्थी संघटनेचा अविस्मरणीय कार्यक्रम

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'अनुबंध' या माजी विद्यार्थी संघटनेची पहिली सर्वसाधारण सभा शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाली.

सभेच्या सुरुवातीस विद्यार्थी संघाचे संघटक प्रा. मोहन पाठक यांनी माजी विद्यार्थी संघाच्या गेल्या वर्षभरातील कार्यक्रम, उपक्रमांची तपशीलवार माहिती देऊन प्रास्ताविक केले.. माजी विद्यार्थी संघाच्या अस्थायी कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष राजन गुप्ते, उदय निरगुडकर व शशांक रसाळ यांनी पुढील उपक्रमांसंबंधीचे विचार स्पष्ट केले. सभेच्या अध्यक्षस्थानी असणाऱ्या पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या व अस्थायी समितीच्या उपाध्यक्षा डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयात होत असणाऱ्या पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या व अस्थायी समितीच्या उपाध्यक्षा डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयात होत असणाऱ्या व नजिकच्या भविष्यात होऊ घातलेल्या सुधारणांविषयी माजी विद्यार्थ्यांना तपशीलवार माहिती दिली. यानंतर गतवर्षी निर्वतलेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कै. शरत् हेगडे व प्रदीप नामजोशी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मध्यतरानंतर सुप्रसिद्ध गझल गायक व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अनिरुद्ध जोशी यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम झाला. शशांक रसाळ यांनी त्यांचा परिचय करून दिला. श्री. जोशी यांना तबल्यावर श्री. दामले यांनी साथ दिली.

सदर कार्यक्रम संयोजित करण्यासाठी प्राचार्य सी. डी. पाटील, उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, नॅकचे आमंत्रक व ज्येष्ठ प्रा. आर. एस. पोद्दार यांचे मार्गदर्शन




श्री. विश्वास कर्णेकर मनोगत व्यक्त करताना
(डावीकडून डॉ. सौ. पेजावर, श्री. शशांक रसाळ, श्री. राजन गुप्ते, प्रा. पोद्दार, प्रा. मोहन पाठक)

लाभले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सौ. वर्षा महाजन, डॉ. सौ. नंदिनी पाटील, डॉ. पुनम कुरले, प्रशांत पै., उमेश ललित, प्रवीण गुरव, विद्या प्रसारक मंडळाचे श्री. कावणकर, संदीप कांबळे यांचे विशेष सहाय्य लाभले. कार्यक्रमास गणित विभागप्रमुख व ज्येष्ठ प्रा. आर. एस. पोद्दार, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. स. ग. मेढेकर, वनस्पती विभागप्रमुख डॉ. श्रीमती मेधा मुळगावकर, प्रा. सौ. मेश्राम, प्रा. विनायक बुरकुले, प्रा. मोझेस कोलेट आदी सहकारी आवर्जून उपस्थित होते.

अनुबंधच्या वतीने प्रा. मोहन पाठक यांनी आभार प्रदर्शन केले.

## ग्रंथपाल नारायण बारसे यांचा सत्कार

के. जी. जोशी कॉलेज ऑफ आटर्स आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयाचे ग्रंथपाल व ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे प्रमुख संयोजक प्रा. नारायण बारसे यांची सार्क डाक्युमेंटेशन सेंटर (SAARC Documentation Centre) तर्फे माहिती तंत्रज्ञानाचे माहिती व्यवस्थापनातील उपयोजन या अभ्यासक्रमासाठी भारतातून निवड झाली आहे.



नारायण वारसे

सदर अभ्यासक्रमासाठी सार्कमधील सात देशातून प्रत्येकी दोन ग्रंथपालाची निवड केली जात असल्याने ही निवड होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. मनुष्यबळविकास या उद्देश्याअंतर्गत सदर अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या अभ्यासक्रमांतर्गत ग्रंथालय व माहिती शास्त्रातील अतिशय महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पुढील विषयांसंदर्भात प्रशिक्षण दिले जाते. डेटाबेस संकल्पना, लायब्ररी ऑटोमेशन, ई-पब्लिशिंग, मल्टिमिडीया टेक्नॉलॉजी, नेटवर्किंग, डिजिटल व व्हर्च्युअल लायब्ररी, लायब्ररी वेब पेज डिझाईनिंग हे ते विषय होत.

ग्रंथालयाच्या स्वरुपात झपाट्याने बदल होत आहेत व ग्रंथालय सेवेच्या माहिती सेवांमध्ये परिवर्तन होत आहे. या पार्श्वभूमीवर सदर अभ्यासक्रम हा अतिशय महत्त्वाचा मानला जातो. हा अभ्यासक्रम पाच आठवड्यांचा असून दिल्ली येथे होणार आहे.

प्रा. नारायण वारसे यांची निवड झाल्याचे समजताच पंधरा ऑगस्टच्या ध्वजारोहण सोहळ्यास प्राचार्य स. वा. गोखले यांनी ध्वनिक्षेपकावरून सर्वांना या वृत्तांची माहिती दिली व महाविद्यालयातर्फे आणि विद्याप्रसारक मंडळातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांच्या सर्व व्यावसायिक सहकाऱ्यांनी त्यांचे मनपूर्वक अभिनंदन केले.

जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयाने लागोपाठ सातव्या वर्षी जेतेपद मिळवून इतिहास घडवला !

## जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे मुंबई विद्यापीठ बॅडमिन्टन स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व !

ठाण्याच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या बॅडमिन्टन संघाने मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन सांघिक व वैयक्तिक बॅडमिन्टन स्पर्धांमध्ये तीन सुवर्णपदक आणि एक रौप्यपदकांची लुट करीत या स्पर्धेवर निर्विवाद वर्चस्व गाजवले.

लागोपाठ सातव्या वर्षी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या पुरुष संघाने सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून या स्पर्धेच्या इतिहासात एक आगळा वेगळा विक्रम केला. आत्तापर्यंत कोणत्याही महाविद्यालयाला सलग सातव्या वर्षी सुवर्णपदक मिळवता आलेले नाही. मुंबई विद्यापीठाच्या मरीन लाईन्स येथील मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १०० हून अधिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. त्यात पुरुष गटात सांघिक स्पर्धेत जोशी-बेडेकर महाविद्यालयाने पोदार वाणिज्य महाविद्यालयावर २-० अशी मात करून (अंतिम फेरी) सुवर्ण पदक मिळवले.

वैयक्तिक स्पर्धेतही महिला एकेरीत जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या नेहा वाडने रुपारेल महाविद्यालयाच्या मयेकरचा ११-८, ११-५ असा पराभव करून सुवर्णपदक पटकावले.

पुरुषांच्या वैयक्तिक स्पर्धेत अंतिम फेरीत जोशी-बेडेकरच्याच दोन स्पर्धकांत झाली हे विशेष ! या 'क्लीन स्वीप' मध्ये अमर मोहितेने प्रवीण उपाध्यायचा १५-८, १५-६ असा पराभव केला.

गेली दहा वर्षे येनहर सॉलोमन, अमरीश शिंदे, मयुरी शहाणे, मयूर घाटणेकर, हिमांशू ठक्कर, अक्षर ठक्कर,

संपदा शेट्ये, मिनाक्षी वाघ, किर्ती कदम, नेहा वाड अशा खेळाडूंनी सातत्यपूर्ण खेळ करून आठ वेळा महाविद्यालयाला जेतेपद मिळवून दिले. यंदाच्या या विजयाने मात्र सतत सातव्यांदा विजेतेपद मिळवून विक्रम करून मुंबई विद्यापीठात इतिहास घडवला. या खेळाडूंचा बॅडमिन्टन प्रशिक्षक श्रीकांत यांचा प्राचार्य स. वा. गोखले यांच्या हस्ते उपप्राचार्या अशोक बडगुजर, उपप्राचार्या शोभा दोशी, क्रीडा शिक्षक प्रकाश मोरे यांच्या उपस्थितीत हृद्य सत्कार करण्यात आला.

**मुंबई विद्यापीठ व अन्य आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धांमध्ये जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे कौतुकास्पद यश !**

मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन बॅडमिन्टन स्पर्धेत मिळवलेल्या दैदिप्यमान यशानंतर जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ तसेच 'मल्हार' सारख्या अन्य आंतरमहाविद्यालयीन विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये कौतुकास्पद कामगिरी बजावून महाविद्यालयाचा नावलौकिक अणखी वाढविला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या 'फाईन आर्टस्' विभागातील 'रांगोळी' स्पर्धेत प्रथम क्रमांक तर 'मल्हार' मधील नाट्य विभागातील 'ॲड ॲक्ट' स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळाला आहे. मुंबई विद्यापीठाच्या चुरशीच्या एकांकिका स्पर्धेत महाविद्यालयाच्या नाट्यचमूला द्वितीय क्रमाकं मिळाला आहे. 'सुधीर फडके स्मृति समिती, डोंबिवली' तर्फे आयोजित पहिल्याच 'समूह गायन' स्पर्धेतही महाविद्यालयाला द्वितीय क्रमांक तर मुंबई विद्यापीठाच्या 'सुगम संगीत' विभागात तृतीय क्रमांक मिळाला आहे. तर मुंबई विद्यापीठाच्याच 'समूह गायन' स्पर्धेत महाविद्यालयाला उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला.

१) मुंबई विद्यापीठ (फाईन आर्टस् विभाग)- रांगोळी स्पर्धा - प्रथम क्रमांक - नितीन कोलटके - तृतीय वर्ष व्यवस्थापन)

२) मुंबई विद्यापीठ (आंतरमहाविद्यालयीन) एकांकिका स्पर्धा - द्वितीय क्रमांक

एकांकिका - 'मुखवटे' लेखिका - ॲड. हर्षदा बोरकर, दिग्दर्शक - राजेश राणे, प्रकाश योजना - योगेश केळकर
कलाकार : पल्लवी वाघ (तृतीय वर्ष कला), सुयोग लोंढे - अभिनय प्रशस्तिपत्र, राजेश्वर मुळे (द्वितीय वर्ष, वाणिज्य), विक्रम चव्हाण (प्रथम वर्ष कला)

३) संगीत विभाग : समूह गायन

अ) 'स्व. सुधीर फडके स्मृती समिती, डोंबिवली' - द्वितीय पुरस्कार
ब) मुंबई विद्यापीठ समूह गायन स्पर्धा, उत्तेजनार्थ पुरस्कार

४) सुगम संगीत : १) मुंबई विद्यापीठ - तृतीय पुरस्कार - प्रीती निमकर

समूह गायन - गायक कलाकार : प्रीती निमकर, प्रिया निमकर, तृप्ती गोखले (तृतीय वर्ष कला), चिराग पांचाळ, यश वैद्य (तृतीय वर्ष वाणिज्य), निखिल जोशी (द्वितीय वर्ष वाणिज्य), संगीत साथ : अभिजित कांबळी (द्वितीय वर्ष वाणिज्य)

विशेष म्हणजे सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर यांचे संगीत लाभलेल्या 'कलीयुग - ५००० (Kaliyug-5000) या हिंदी चित्रपटासाठी चिराग पांचाळ (तृतीय वर्ष वाणिज्य) या विद्यार्थ्याने पहिल्यांदाच गायलेल्या गीताचे नुकतेच ध्वनीमुद्रण पूर्ण झाले. नितीन कोलटके हा तृतीय वर्ष व्यवस्थापन शाखेचा विद्यार्थी मुंबई विद्यापीठ तसेच अन्य रांगोळी स्पर्धांत सातत्याने प्रथम क्रमांकाने विजयी होत आहे. त्याचप्रमाणे प्रिती, प्रिया या निमकर भगिनी गायन स्पर्धेत लागोपाठ तीनही वर्षी विविध स्पर्धांत पारितोषिक मिळवित आहे तर गतवर्षी 'अल्का महाकरडंक मराठी एकांकिका' स्पर्धेत जोशी-बेडेकर महाविद्यालयाने ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला होता.

अशा या सर्व विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये कौतूकास्पद यश मिळवून महाविद्यालयाची ध्वजा सतत फडकवत ठेवणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांचा प्राचार्य स. वा. गोखले यांच्या हस्ते आणि उपप्राचार्य अशोक वडगुजर आणि सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा. दिगंबर भिडे यांच्या उपस्थितीत शानदार सत्कार करण्यात आला.

### इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

जोशी-बेडेकर कला, वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २००३ रोजी करण्यात आले. या प्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातील प्रपाठक प्रा. डॉ. कुर्मी वेवायना या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. इंग्रजी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष आणि महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. मुरलीधर सायनेकर यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले व या वाङ्मय मंडळाचा हेतू विशद केला. प्रा. शुभदा रानडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुमारे तासभर रंगलेल्या या व्याख्यानात डॉ. वेवायना यांनी श्रेष्ठ साहित्य मानवी जीवनावर कोणता व कसा प्रभाव पाडते हे सोदाहरण स्पष्ट केले. इंग्रजी विभागातील कु. मानसी भोर यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास प्राचार्य स. वा. गोखले, उपप्राचार्य वडगुजर, उपप्राचार्या सौ. दोशी, अनेक प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### महिला विकास कक्ष

महिला विकास कक्षातर्फे दि. २५ ऑगस्ट २००३ रोजी 'विवाहपूर्व समुपदेशन' या कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय व तृतीय वर्षातील कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी करण्यात आले. कक्षाच्या सदस्या प्रियंवदा टोकेकर यांनी व्यासपीठावरील मान्यवर विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचे स्वागत केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या प्रास्ताविकात त्यांनी व्यक्तीला घडविण्यात शैक्षणिक संस्थांची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे स्वरूप-विविध सत्र याविषयक माहिती दिली व अशा कार्यक्रमांची गरज निर्माण होण्यामागच्या कारणांचा ऊहापोह केला.

पहिल्या सत्रात डी. वाय. पाटील विधी महाविद्यालयात प्राचार्य असणाऱ्या डॉ. स्मिता कर्वे यांनी विवाहविषयक कायद्यांचा आढावा सामाजिक दृष्टीकोनातून घेतला. दुसऱ्या सत्रात मुंबई विद्यापीठातील मानसशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. अनुराधा सोवनी यांनी 'जोडीदाराची निवड व वैवाहिक समायोजन' हा विषय मांडला. पती-पत्नीतील वैवाहिक नाते त्यांनी इतर नात्यांच्या पार्श्वभूमीवर रेखाटले. रिलेट या शब्दातील प्रत्येक अक्षरातून नात्याचा एक पदर त्यांनी उलगडला व त्याचप्रमाणे वैवाहिक समस्या कशा टाळता येतील हे थोडक्यात सांगितले. तिसऱ्या सत्रात ज्ञानसाधना महाविद्यालयातील प्राध्यापिका सीमा केतकर यांनी स्त्री व पुरुष यांच्या शरीराची रचना प्रजोत्पादनाची क्रिया याविषयी वेगवेगळ्या slides दाखवत मुलांशी संवाद साधला.

### डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या माध्यमिक शाळेतर्फे राखी प्रदर्शन

डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या माध्यमिक शाळेतर्फे आज शाळेच्या शिक्षिकांनी राख्यांचे सुंदर प्रदर्शन भरविले होते.

ह्या प्रदर्शनात इ. ६ वी व ७ वीतील विद्यार्थिनींनी तयार केलेल्या राख्या मांडण्यात आल्या होत्या. विद्याप्रसारक मंडळाचे श्री. ज. कांदीकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, उपमुख्याध्यापिका ज्योत्स्ना चौबळ, शाळेतील सेवानिवृत्त कलाशिक्षक प्र. ग. वैद्य यावेळी उपस्थित होते.

सौ. सविता केळकर, प्र. ग. वैद्य कलाशिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर ह्यांनी प्रदर्शन पाहून आपले मनोगत व्यक्त केले. या प्रदर्शनात नागपंचमीच्या निमित्ताने वारुळ व नाग असे सुंदर दृश्य दाखविण्यात आले होते.

### जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयात शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आमच्या महाविद्यालयामध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव प्राचार्य श्री. स. वा. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा झाला. प्रारंभी शाहू महाराजांच्या भव्य प्रतिमेला प्राचार्यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व मराठी विभाग प्रमुख प्रा. दामोदर मोरे यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कामगिरीवर प्रकाश टाकला. प्रा. सुभाष शिंदे यांनी आपल्या भाषणातून शाहू महाराजांच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य स. वा. गोखले म्हणाले की, लोकांचे शोषण करणारे ते संस्थानिक नव्हते, पारंपारिक संस्थानिकांपेक्षा लोककल्याणकारी राजे अशी त्यांची लोकमानसात प्रतिमा होती. यावेळी नौपाडा प्रभाग समिती, ठाणे अध्यक्ष श्री. भास्करराव पाटील हेही मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन हिन्दी विभाग प्रमुख प्रा. अनिल दवळे यांनी केले. कार्यक्रमास विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**- संकलित**

---

मा. पाठक सर,

'दिशा'चा मी नियमित वाचक आहे. दिशातील सर्वच साहित्य केवळ वाचनीयच नव्हे तर अंतर्मुख करणारे असते, संग्राह्य असते. सवंग नियतकालिकांच्या प्रवाहात आपण शैक्षणिक संस्थेच्या या व्यासपीठासाठी जे काम करता त्याचे महत्त्व फार आहे. लोकांना वैचारिक वाचायला आवडत नाहीत, लोक दर्जेदार लिहीत नाहीत असे नुसते म्हणत बसण्याऐवजी वि. प्र. मंडळाने इतर संस्थांसाठीही आदर्श निर्माण केला आहे.

आपले संपादकीय मोजक्या शब्दात पण त्या विषयाबाबत विचार करायला लावेल असे असते !

या उपक्रमाबद्दल आपले व खास करून वि. प्र. मंडळाचे विशेष अभिनंदन ! दिशासाठी माझ्या व माझ्या कुटुंबियाच्या शुभेच्छा !

स्नेहांकित

**सतीश डोंगरे, कल्याण**